SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तुमच्या जिभेला द्या चव...आणि भोजनाचा घ्या आनंद...
स्वादिष्ट.. रुचकर राजस्थानी थाळी
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर. फोन : 2327060, 9850799850

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १९.०९.२०२५ | अंक नं. १४४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

किमान 20% किंवा
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना..
तेवढी टक्के मजुरीत सूट..
उत्सव मजुरीचा
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सुवर्णसमृध्दी योजना
मासिक 10 हप्ते भरा व सोने खरेदी करताना भरघोस फायद्यासह मजुरीत 10% सूट मिळवा.
लकी गोल्ड योजना
100% मजुरीत सूट
मासिक 11 हप्ते भरा व सोने खरेदी करताना मजुरीत 100% सूट मिळवा.
Conditions Apply*

उच्च दर्जा.. योग्य किंमत..
हिच तर आमची खासियत..
Available In Top Brands
Hettich HÄFELE GRASS blum ITALICA ebco
NEW BOMBAY Since 1972
KITCHENS & WARDROBE
Ahilyanagar Off.: Excel Arcade, Near HDF Bank, Laltaki, Ahilynagar.
Pune Off.: 1, Patil Plaza, Mitra Mandal Chowk, Pune.
Cell.: 98909 85601 | 98222 94670.

# जात पडताळणी समिती कार्यालयातील भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर; प्रमाणपत्रासाठी द्यावी लागतेयं लाच; पैसे घेताना महिलेस पकडले

नगर - नगरच्या जात पडताळणी समिती कार्यालयात २-३ महिने उलटूनही जात पडताळणी प्रमाणपत्र दिले जात नसल्याच्या अनेक नागरिकांच्या तक्रारी आहेत. जो पैसे देईल त्याला लगेच प्रमाणपत्र दिले जाते, याचा मोठा पुरावाच आता समोर आला आहे. कुणबी जातीचे पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी एका व्यक्तीला २० हजारांची लाच मागून तडजोडी अंती १८ हजारांची लाच स्विकारताना या कार्यालयात स्टेनो म्हणून काम करणाऱ्या महिलेला नगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

श्रीमती उषा मंगेश भिंगारदिवे (वय ३३, रा. श्रीनाथ कॉम्प्लेक्स, मिस्तबाग चौक, अहिल्यानगर) असे या महिलेचे नाव असून तिने ही लाच स्वत: साठी तसेच या कार्यालयातील तिदमे नावाचे अधिकारी आणि त्यांच्या सह इतर १० ते १२ जणांना देण्यासाठी मागितली असल्याचे या कारवाई दरम्यान समोर आले आहे.

या कारवाईबाबतची माहिती अशी की, सावेडी उपनगरात राहणारे यातील तक्रारदार यांच्या मुलीच्या उच्च शिक्षणासाठी कुणबी जातीचे जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक होते. त्यामुळे त्यांनी १६ जून रोजी ऑनलाईन अर्ज सादर केला. तसेच अहिल्यानगर येथील जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयात त्या संदर्भात अर्ज व पूरक कागदपत्रे जमा केले होते, परंतु ३ महिने उलटूनही सदरचे प्रमाणपत्र अद्याप पावेतो मिळले नसल्याने तक्रारदार यांना श्री साई सायबर कॅफेचे मेहेत्रे यांनी खाजगी महिला श्रीमती उषा भिंगारदिवे यांच्याशी संपर्क करून दिला. तक्रारदार यांनी त्यांच्याशी संपर्क साधला असता श्रीमती भिंगारदिवे यांनी तुमच्या मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र मी मिळवून देते परंतु त्यासाठी मला २० हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणून तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केली परंतु तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी नगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे खाजगी महिलेविरुद्ध लाच मागणीची तक्रार नोंदविलेली होती.

या तक्रारी नंतर १८ सप्टेंबर रोजी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीप्रमाणे पंचासह संबंधित महिलेकडे लाच मागणी पडताळणी करिता पाठविण्यात आले होते. त्यादरम्यान खाजगी महिला यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार यांच्या मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळून देण्याच्या मोबदल्यात जात पडताळणी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी व स्वतःसाठी तडजोडी अंती १८ हजार रुपये लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली.

लाचेच्या मागणीची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर तक्रारदाराने सदर महिलेला थोड्याच वेळात घरून पैसे घेवून येतो असे सांगून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाच्या सूचनेनुसार १८ हजार रुपयांच्या ५०० च्या नोटा घेवून सावेडी उपनगरातील जुना पिंपळगाव रोड वर असलेल्या एका हॉटेलकडे गेले. तेथे थोड्या वेळाने ती महिला आली आणि तिने तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम स्वीकारत असताना तिला रंगेहात पकडण्यात आले आहे. तिच्या अंग झडती मध्ये लाच म्हणून स्वीकारलेली रोख रक्कम व मोबाईल आढळून आला. तो ताब्यात घेण्यात आला असून त्याची तपासणी केली जाणार आहे. लाच स्वीकारणाऱ्या उषा भिंगारदिवे या महिलेच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात १९ सप्टेंबर रोजी पहाटे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलिस उपअधिक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक छाया देवरे, पोलिस अंमलदार सचिन सुदुक, गजानन गायकवाड, वैभव सुपेकर यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास पो. नि. छाया देवरे या करत आहेत.

## कारवाई दरम्यान धक्कादायक माहिती समोर

सावेडी येथे असलेल्या जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयात कशाप्रकारे भ्रष्ट कारभार चालू आहे, हे या कारवाई दरम्यान समोर आले आहे. ज्यावेळी तक्रारदाराने त्या महिलेकडे २० हजार खूप होतात १५ हजार घ्या अशी विनंती केली असता तिने तेथे अनेकांना पैसे द्यावे लागतात. कार्यालयातील तिदमे नावाचे अधिकारी तर पैसे दिल्याशिवाय जात पडताळणी प्रमाणपत्रावर सही करत नाहीत. तसेच कार्यालयातील इतरांना ही पैसे द्यावे लागतात. त्यांना वरून खूप प्रेशर आहे. अशी माहिती सांगितली. वरून प्रेशर आहे, म्हणजे नेमके कुठून, की थेट मंत्रालयातून असा याचा अर्थ नाही ना? त्यामुळे या कार्यालयातील अधिकाऱ्यांना थेट वर पर्यंत पैसे द्यावे लागतात काय? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे.

## मनोज जरांगे पाटील यांनीही केली होती तक्रार

जात पडताळणी समिती कार्यालयातील भ्रष्टाचाराचा विषय हा फक्त नगर जिल्ह्यापुरताच मर्यादित नाही तर तो राज्यात सर्वत्र आहे. कारण मनोज जरांगे पाटील यांनी ही आझाद मैदानातील उपोषण सोडण्याच्या वेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व शिवेंद्रराजे भोसले यांच्या समोर जात पडताळणी समितीकडून नागरिकांची अडवणूक होत असल्याची तक्रार केली होती. त्यावेळी या संदर्भात तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिले होते. तरीही नगर मधील कार्यालयातील अडवणूक सुरूच असल्याचे या कारवाईमुळे समोर आले आहे.

# महाराष्ट्रात पुढील २४ तासांत मुसळधार पावसाचा इशारा

पुणे - राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस सुरू आहे, याचा मोठा फटका हा मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात बसला आहे. मराठवाड्यामध्ये पावसाच्या तडाख्याने शेतकऱ्यांच्या ऐन हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. तसेच पावसामुळे नदी-नाल्यांना आलेल्या पुराचा देखील मोठा फटका बसला आहे. या पुरात अनेक जनावरांचा मृत्यू झाला आहे. शेतातील पिके वाहून गेली आहेत, तर अनेकांचे संसार देखील उघड्यावर आले आहेत. दरम्यान अजूनही पावसाचा धोका टळलेला नाहीये, २० सप्टेंबर रोजी देखील अनेक भागांमध्ये भारतीय हवामान विभागाकडून जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाकडून दिलेल्या इशाऱ्यानुसार राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच ताशी ३० ते ४० प्रति किमी वेगाने वारे देखील वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यावर दुहेरी संकट असणार आहे, या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. या काळात वाऱ्याचा वेग प्रति तास ३० ते ४० कीमी इतका असण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार कोकणामध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, कोकणातील तीन जिल्हे सिंधुदुर्ग, रायगड आणि रत्नागिरीमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, तर मुंबई आणि पालघरमध्ये मध्यम ते जोरदार स्वरुपाचा पाऊस पडू शकतो असा अंदाज आहे.

दुसरीकडे पश्चिम महाराष्ट्रात सातारा, सांगली, पुणे या जिल्ह्यांमधील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर आणि सांगली या जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान विदर्भात हवामान विभागाकडून जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला असून विदर्भातील जवळपास सर्वाच जिल्ह्यांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. विदर्भासह मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे.





**अहिल्यानगर शहरात मोठी वाहतूक कोंडी...** अहिल्यानगर शहरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी पाहायला मिळते. सर्जेपुरा, दिल्लीगेट, नीलक्रांती चौक या रस्त्यांवर सकाळपासून तर दुपारपर्यंत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. त्यामध्ये एक रुग्णवाहिकाही अडकून पडते. वाहतूक सुरळीत करण्यासाठी शहर वाहतूक शाखेचे पोलिस कर्मचारी नसतात त्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. (छाया - धनेश कटारिया)

एक विश्वास.. एक बांधिलकी...
रामकृष्ण अर्बन
घरबसल्या नेट बँकिंग आता तुमच्या एका क्लिकवर
आमच्या सर्व सभासद व खातेदारांसाठी उपलब्ध झालेल्या आधुनिक सेवा-
✓ ऑनलाईन बँकिंग व्यवहार ■ मोबाईल बँकिंग ॲप
✓ RTGS / NEFT / IMPS द्वारे तात्काळ पैसे पाठवा
✓ कार्यालयीन वेळेत सुरक्षित व्यवहार सुविधा
✓ घरबसल्या करा तुमचे सर्व व्यवहार, सुरक्षित, सोपे व जलद
मोबाईल व ऑनलाईन व्यवहारासाठी आजच संपर्क साधा - मो. 92096 70178
श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी लि.
मुख्य शाखा : 'रामकृष्ण भवन', जुनी वसंत टॉकीज, माळीवाडा, अहिल्यानगर.
दूरध्वनी : ०२४१ - २३४५०३४ मो. ८०५५८८९९०१
सावेडी शाखा : सोनानगर चौक, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर. फोन : -०२४१- २३२४८४८
Website : www.ramkrishnaurbancredit.co.in
सर्व सभासदांना आग्रहाचे निमंत्रण
४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा - शनिवार दि. २०-९-२०२५, रोजी सायं. ५.०० वा.
स्थळ : बडीसाजन मंगल कार्यालय, आनंदऋषिजी हॉस्पिटल शेजारी, अहिल्यानगर

जवखेडे खालसा, ता.पाथर्डी गावची कन्या
कु. सेजल राजू वाघ
यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परिक्षेत राज्य कर निरीक्षक (STI) या पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
समस्त ग्रामस्थ नातेवाईक व मित्र परिवार

विना ऑपरेशन शिबीर
* वधललेले कान मिनिटांतच चिटकवा
* विना ऑपरेशन रामबाण उपाय
* डोळा- मोतीबिंदू, लासूर ड्रॉपने घालवा
* नाक- खोकला, सर्दिसाठी Asclepius
* त्वचा- पिंपल्स,काळे डाग, व्रण, मोस काढणे, टॅटू पुसुन टाकणे, कपाळाचे गोंधण काढणे
* सगळे व्यसन सोडवा नशामुक्ती स्प्रे वापरा
* दारु, गुटखा,तंबाखु, बिडी-सिगारेट
हर्बल स्प्रे वापरा नशामुक्त व्हा...!
डॉ. मंजुषा- 7507718246

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक


नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# रोडवर कचऱ्याचे ढीग, विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात, शहरातील समस्येत जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे

नगर - महापालिका प्रशासनाच्या ढिसाळ व नियोजन शून्य कारभारामुळे नगरकर अक्षरशा त्रस्त झाले आहे. नागरिक विविध प्रश्नांना सामोरे जात असताना गेल्या दीड महिन्यापासून नगर शहरातील कचरा संकलनाची व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. शहरातील सर्वच भागांमध्ये मोठमोठे कचऱ्याचे ढीग दिसून येतात. कल्याण रोडवरील उद्धव अॅकॅडमी शाळेसमोर कचऱ्याचे ढीग निर्माण झाले आहेत. त्यातच शहरात सुरू असलेल्या पावसामुळे कचरा पूर्णपणे सडल्यामुळे परिसरात दुर्गंधीही पसरली आहे. या सर्व परिस्थितीमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आलेले असून त्यामुळे विविध आजार पसरण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. नगर शहरात उद्भवलेल्या कचरा समस्येमध्ये आता जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, कचरा समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनास द्याव्यात, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.


कचरा समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनास द्याव्यात, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

गेल्या दीड महिन्यापासून शहरातील घंटागाडीद्वारे कचरा संकलनाची व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. आठ आठ दिवसांचा कचरा नागरिकांना घरात साठवून ठेवावा लागत आहे. परंतु त्यामुळे घरातही दुर्गंधी पसरत असल्यामुळे लोक नाईलाजास्तव घरातील कचरा सार्वजनिक ठिकाणी आणून टाकत आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष : नागरी घनकचरा व्यवस्थापन व संकलन याबाबत केंद्र व राज्य शासनाचे कठोर नियम तयार आहेत. मात्र गेल्या दीड महिन्यापासून या नियमांचे महापालिका प्रशासनाकडून गंभीर उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास येऊन देखील याकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पूर्णपणे दुर्लक्ष होताना दिसून येते.

नगर शहरात निर्माण झालेल्या कचरा समस्येमुळे शालेय विद्यार्थ्यांचे तसेच सार्वजनिक आरोग्य धोक्यात आलेले असून जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घ्यावी. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकाऱ्यांनी शहरातील कचरा समस्येची समक्ष पाहणी करून आढावा घ्यावा, अशी मागणी संतप्त पालक वर्गातून होत आहे.

### तर महापालिका प्रशासनावर होऊ शकतो गुन्हा दाखल

गेल्या दीड महिन्यापासून शहरातील नागरिक घनकचरा संकलन व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असल्यामुळे व त्यातच सुरू असलेल्या पावसामुळे सर्वत्र कुजलेले कचऱ्याचे ढीग व दुर्गंधी पसरलेली आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. सार्वजनिक आरोग्य धोक्यात आणणे हा एक गुन्हा आहे, जो भारतीय दंड संहितेच्या (खझउ) कलम २६९ आणि २७० नुसार शिक्षापात्र आहे. बेकायदेशीरपणे किंवा निष्काळजीपणे असा कोणताही प्रयत्न केल्यास, ज्यामुळे जीवघेणा रोग किंवा संसर्ग पसरण्याची शक्यता असते, अशा व्यक्तीला सहा महिन्यांपर्यंत तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. या समस्येची जिल्हा पोलीस प्रशासनाने दखल घेतल्यास ते स्वतःहून महापालिका प्रशासनावर गुन्हा दाखल करू शकतात.

### जिल्हा प्रशासनातील सर्वच प्रमुखांनी आपापले अधिकार वापरावेत

जिल्हा प्रशासनाचे सर्वच प्रमुख अधिकारी यामध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, महापालिका आयुक्त तथा प्रशासक, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा प्रधान व सत्र न्यायाधीश, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे नगर शहरातच राहतात त्यांनाही ही कचरा समस्या जाणवते. त्यांनीही याप्रकरणी आपापले अधिकार वापरले पाहिजेत अशी मागणी समस्त नगरकर जनतेतून होत आहे.

## रेखा जरे हत्याकांडातील महत्वाच्या साक्षीदाराची २३ सप्टेंबर रोजी साक्ष

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील गाजलेला रेखा जरे खून खटला पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि मयत रेखा जरे यांचा मुलगा कुणाल जरे येत्या २३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीत आपल्या आईच्या खुनाबाबत न्यायालयात साक्ष देणार आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या सुनावणीकडे लागले आहे.

घटनेच्या वेळी प्रत्यक्ष हजर असलेल्या कुणाल जरे याची साक्ष सरकार पक्षासाठी निर्णायक ठरणार आहे. सरकारी वकील अॅड. ए. डी. ढगे यांनी कुणालचा सरतपास सुरू केला असून, त्यानंतर आरोपींच्या वकिलांकडून होणारा उलटतपास खटल्याचे भवितव्य ठरवू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. याआधी मयत रेखा जरे यांची आई व मैत्रीण विजयमाला माने यांनीही न्यायालयात हजर राहून महत्त्वपूर्ण साक्ष दिली होती. त्या वेळी आरोपी पक्षाचे वकील अॅड. परिमल फळे यांनी केलेल्या उलटतपासाची मोठी चर्चा झाली होती.

या प्रकरणातील पुढील सुनावणी २३ सप्टेंबर रोजी होणार आहे. कुणाल जरे यांचा उलटतपास अॅड. परिमल फळे हे मुख्य आरोपीतर्फे त्याच दिवशी सुरू करण्याची शक्यता आहे. महत्त्वाच्या साक्षीदारामुळे न्यायालय परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## डाळींब आणि लिंबूवर्गीय फळपिक उत्पादक शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन वेबिनारचे आयोजन

नगर - डाळींब व लिंबूवर्गीय फळपिकांवर येणाऱ्या किडरोगांचे नियंत्रण व व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी १९ व २४ सप्टेंबर रोजी ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या वेबिनारचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

डाळींब फळपिकांवरील किडरोग नियंत्रण व व्यवस्थापन या विषयावर १९ सप्टेंबर रोजी वेबिनार होणार आहे. यात कृषी आयुक्तालय, पुणे येथील फलोत्पादन संचालक अंकुश माने व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील.

लिंबूवर्गीय फळपिकांवरील किडरोग नियंत्रण व व्यवस्थापन या विषयावर २४ सप्टेंबर रोजी वेबिनार होईल. यात फलोत्पादन संचालक अंकुश माने व नागपूर येथील राष्ट्रीय लिंबूवर्गीय संशोधन केंद्राचे डॉ. नरेश मेश्राम शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील सर्व डाळींब व लिंबूवर्गीय फळपिकांचे उत्पादक शेतकऱ्यांनी या ऑनलाईन वेबिनारचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी नजीकच्या सहायक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# शहर पोलिस उपअधीक्षकपदी दिलीप टिपरसे यांची नियुक्ती



नगर - नगर शहर विभागाच्या पोलिस उपअधीक्षक पदावर गंगाखेड (जि. परभणी) येथील उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांची बदली करण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागाने नुकत्याच केलेल्या बदल्यांमध्ये राज्यातील १६ उपअधीक्षकांची बदली करण्यात आली असून, १५ परिवीक्षाधीन उपअधीक्षकांना नवीन नियुक्त्या दिल्या आहेत. नगर जिल्ह्यात परिवीक्षाधीन कार्यकाळ पूर्ण केलेले उपअधीक्षक संतोष खाडे यांची बदली मेहकर (जि. बुलढाणा) येथे झाली आहे.

शहर उपअधीक्षक अमोल भारती यांची बदली शिर्डी विभाग उपअधीक्षकपदी झाल्यानंतर शहरातील हे पद रिक्त होते. या दरम्यान ग्रामीण उपअधीक्षक शिरीष वमने यांच्याकडे अतिरिक्त पदभार होता. त्यामुळे शहर उपअधीक्षक पदासाठी अनेकांची नावे चर्चेत होती. अखेरीस अनुभवी अधिकारी दिलीप टिपरसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्याची जबाबदारी उपअधीक्षक टिपरसे यांच्यावर राहणार आहे. खून, खूनाचा प्रयत्न, दोन समाजांतील तणाव, विविध आंदोलन, मोर्चे यामुळे शहर उपविभाग कायम चर्चेत असतो. या सर्व आव्हानात्मक परिस्थितीत शहरातील शांतता आणि कायदा-सुव्यवस्था टिकवून ठेवण्याचे कठीण काम नव्याने आलेल्या उपअधीक्षक टिपरसे यांच्यासमोर आहे.

## प्रभाकर वाघ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



नगर - सावेडीतील पाईपलाईन हडको येथील रहिवासी प्रभाकर बळवंत वाघ (वय ६२) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गेल्या अनेक वर्षे त्यांनी चालक म्हणून काम केले. सध्या ते लाँड्रीचा व्यवसाय करत होते. १८ सप्टेंबर रोजी सकाळी अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान सकाळी साडेदहाच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले. नालेगाव अमरधाममध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मनसेच्या वाहतूक सेनेचे तालुकाध्यक्ष स्वप्नील वाघ यांचे ते वडील होत.

## आशाबाई बेताळा यांचे आकस्मिक निधन



नगर - शाहूनगर केडगाव येथील रहिवासी सौ. आशाबाई हिरालाल बेताळा (वय ५९) यांचे १९ सप्टेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. नालेगाव अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जैन कचोरीवाले हिरालाल बेताळा यांच्या त्या पत्नी होत.



आरक्षणासाठी नंदीवाले तिरमली समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

## श्रीमती शामाबाई मुनोत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - गुलमोहोर रोड वरील पागा बिल्डींग येथील रहिवासी श्रीमती शामाबाई कांतीलाल मुनोत (वय ८६) यांचे १८ सप्टेंबर रोजी पुणे येथे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर १९ सप्टेंबर रोजी पुणे येथील नवीपेठ वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्या हॉटेल नटराज, टॉप अप पेट्रोल पंप, महेश थिएटरच्या संचालिका होत्या. त्यांच्यामागे ५ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# मायबाप सरकार आरक्षण मिळेल का? गुबूगुबू..; 'नंदीबैलांनी' सरकारला वाकून घातला नमस्कार

### राहायला घर नाही, शेती नाही, रोजगार नाही : आरक्षणासाठी नंदीवाले तिरमली समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

नगर - राहण्यासाठी जागा नाही..., शेती नाही..., मुलांना उच्च शिक्षण दिले, पण नोकरी नाही..., रोजगार नाही..., हाताला काम नाही... अशा हृदयस्पर्शी व्यथा मांडत नंदीवाले तिरमली समाजाने १८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. अनुसूचित जमातीचा दर्जा मिळून आरक्षण मिळण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता.

नंदी बैलांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाने धडकलेल्या समाज बांधवांनी घोषणाबाजी करत सरकारकडे आरक्षणाची मागणी केली. आंदोलनातील नंदीबैलांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारातून आत शिरून सरकार व अधिकाऱ्यांसमोर वाकून नमस्कार घातला, हा अनोख्या प्रसंगाने सर्वांचे लक्ष वेधले.

मोर्चाला प्रारंभ जुने बसस्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून झाला. यानंतर नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर मोटारसायकल रॅली काढण्यात आली. पुढे महापालिकेसमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पायी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात महिलांसह समाज बांधव उपस्थित होते.

या मोर्चाचे नेतृत्व नंदीवाले तिरमली समाजाचे सुभाष काकडे यांनी केले. या वेळी छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बाळू विशे, संस्थापक अध्यक्ष प्रवीण कानवडे, उपाध्यक्ष प्रदीप औटी, अजय शेळके, विनोद साळवे, योगेश खेंडके, महेश काळे, अजित शिंदे, बाबुराव फुलमाळी, भीमा औटी, विष्णू पवार, गणेश गुंडाळे, उत्तम फुलमाळी, भानुदास फुलमाळी, दीपक औटी, रावसाहेब फुलमाळी, सुरेश औटी, रामा आव्हाड, लिंबाजी देशमुख, अण्णा फुलमाळी, आदिनाथ ओनारसे, बाळू औटी, गुलाब काकडे यांच्यासह जिल्ह्यातील समाज बांधव सहभागी झाले होते.

महाराष्ट्रातील तिरमली नंदीवाले समाजास हैदराबाद, सातारा गॅझेटनुसार भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३६६ (खंड २५) व अनुच्छेद ३४२ नुसार अनुसूचित जमाती किंवा आदिम जमातीचा दर्जा प्राप्त आहे. राष्ट्रपतींना अनुसूचित जमाती विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार असून १९५० मध्ये पहिला आदेश काढण्यात आला. पुढे १९५६ व १९६० मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली.

२७ जुलै १९७७ पासून अनुसूचित जाती-जमाती आदेश (सुधारणा) अधिनियम १९७६ अस्तित्वात आला. या अधिनियमानुसार क्षेत्र बंधन दूर झाल्यामुळे तिरमली नंदीवाले समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात आजतागायत आरक्षणाचा लाभ मिळालेला नाही. यामुळे समाजामध्ये तीव्र असंतोष असून तातडीने हा प्रश्न निकाली काढण्याची मागणी निवेदनाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्याकडे करण्यात आली.

मोर्चात सहभागी झालेल्या महिलांनी व युवकांनी राहण्यासाठी घर नाही, शेती नाही, मुलांना शिक्षण दिले पण रोजगार नाही, नोकरी नाही... आमच्या समाजाला आरक्षण मिळणार की नाही? शासनाला थेट प्रश्न विचारला. शासनाने या प्रश्नाचे तातडीने उत्तर द्यावे व आरक्षण जाहीर करण्याची मागणी केली.

## धिरज माहुरकर यांचे आकस्मित निधन



नगर - डिझाईनर्स कॉलनी रासनेनगर येथील रहिवासी धिरज (सोनू) राजेंद्र माहुरकर (वय ३५) यांचे १८ सप्टेंबर रोजी आकस्मित निधन झाले. १९ सप्टेंबर रोजी अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे. नितीन चंद्रकांत रासने यांचे ते भाचे होत.

## हनुमंत लंके यांचे अल्प आजाराने निधन



पारनेर - निघोज येथील रहिवासी हनुमंत सदु लंके (वय ८४) यांचे १८ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर निघोज स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, ४ मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. किशन कन्हैय्या उद्योग समूहाचे संस्थापक शिवाजीराव लंके व प्रगतीशील शेतकरी सावकार लंके व राजू लंके यांचे ते वडील होत तसेच निघोजचे माजी सरपंच कैलास लंके यांचे चुलते होत.


बारा बलुतेदार महासंघाची जिल्हा कार्यकारणीमध्ये श्रीगोंदा तालुका अध्यक्षपदी राजेंद्र कुटे, उपाध्यक्षपदी डॉ. अशोक गायकवाड, जिल्हा सल्लागारपदी कांतीलाल कोकाटे यांची निवड करण्यात आली. (छाया - विजय मते)

## बारा बलुतेदार महासंघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

नगर - महाराष्ट्र प्रदेश बारा बलुतेदार महासंघाच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामधे श्रीगोंदा तालुका अध्यक्षपदी राजेंद्र कुटे, जिल्हा उपाध्यक्षपदी डॉ. अशोक गायकवाड, जिल्हा सल्लागारपदी कांतीलाल कोकाटे यांची निवड जाहीर झाली. बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष माऊली गायकवाड यांच्या हस्ते पत्रक देऊन निवड जाहीर करण्यात आली. यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन सर्वांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा कार्याध्यक्ष अनिल इवळे, जिल्हा सचिव मच्छिंद्र बनकर, आदिनाथ गायकवाड, मल्हारी गीते, संदीप घुले, जिल्हा सचिव (उत्तर) इंद्रजीत कुटे, युवा जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर दळवी व जिल्हा उपाध्यक्ष पांडुरंग शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महाराष्ट्र कर निरीक्षकपदी अहिल्यानगरचे सौरभ नरवडे



नगर - महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागातील वर्ग दोनच्या राज्य कर निरीक्षक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत टाकळी खातगाव (ता.नगर) येथील सौरभ नरवडे उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात ८८ वा क्रमांक मिळवून हे यश संपादन केले आहे. यापूर्वी पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेतही यश मिळविले होते.

सौरभ नरवडे यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तर माध्यमिक शिक्षण हनुमान विद्यालय टाकळी खातगाव येथे झाले. त्यानंतर मॅकेनिक इंजिनिअर ही पदवी घेतल्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. यापूर्वी पोलिस उपनिरीक्षकपदाची परीक्षेत यश मिळविले होते. शहरातील सिद्धीबाग शॉपिंग सेंटर येथील शिवम इलेक्ट्रीकल्सचे संचालक एकनाथ (बाळासाहेब) नरवडे यांचे मुलगा तर लष्करातील सेवानिवृत्त अधिकारी दत्तात्रय नरवडे यांचे ते पुतणे आहेत.

## लक्ष्मीबाई ठाकरे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील लक्ष्मीबाई हिरामण ठाकरे (वय ७५) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मेनरोड येथील श्रीराम भजेवाले श्रीराम ठाकरे, अशोक ठाकरे व गोरख ठाकरे यांच्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

केळ्यात बी-६ नावाचे जीवनसत्व असते. या जीवनसत्वामुळे मूत्र खड्यांच्या निर्मितीला आळा बसतो, तसेच किडनीस्टोन झालेल्यांना केळ्याच्या सेवनाने आराम पडतो. त्याचप्रमाणे कृश शरीरयष्टीच्या लोकांनी केळे खाल्ल्यास वजन वाढण्यास लाभ होतो.

---

ज्यांना शुगरचा त्रास असतो त्यांनी कच्च्या पपईचे सेवन करून रक्तात शर्कराच्या मात्रेला कमी करू शकता. यामुळे शरीरात इंसुलिनची मात्रा वाढते. पपई पोटाशी निगडित समस्या दूर करते आणि शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढते.

मात्र गर्भवती महिलेस पपई खायला देऊ नये.

## पाककला

### भाजणीच्या चकल्या

**भाजणीचे साहित्य** - १ किलोग्रॅम तांदूळ, १/२ किलो चणा दाळ, १/४ किलो उडीद दाळ, अर्धा पाव मूग दाळ, एक मूठ धने, दोन चमचे जिरे, एक मूठ साबूदाणे.

**कृती** - एका कढईत वरील सर्व साहित्य एक एक करून गुलाबी रंग येईपर्यंत खरपूस भाजून घ्या. नंतर सर्व साहित्य एकत्र दळून घ्या. जितक्या कणकेच्या चकल्या करावयाच्या असतील तितकी कणिक एका कढईत घ्या. त्यात तेलाचे मोहन, चवीप्रमाणे तिखट, मीठ, ओवा, जिरे, चिमूटभर खाण्याचा सोडा दोन चमचे लोणी टाकून हे कणिक जास्त सैलही नाही व घट्टही नाही असे मळून घ्या. चकल्याचा साचा घेवून त्याला आतून तेल लावून वरील भजलेली थोडी थोडी कणिक घेऊन चकल्या पाडून घ्या. एका कढईत तेल तापवून तयार केलेल्या चकल्या लालसर रंग होईपर्यंत तळून घ्या.

## वास्तू

* देवघरातील मूर्तीचे तोंड उत्तर वा दक्षिण दिशेला असू नये.

* आपल्या घराच्या दरवाजावर शुभचिन्हे म्हणजे स्वस्तिक, ॐ, गणपती, कुबेर यांची चित्रे लावावी. त्यामुळे बाहेरील अमानवी शक्तींपासून वास्तूसहीत सर्व कुटुंबियांचे रक्षण होते. देवघरात तुटक्या-फुटक्या वस्तू ठेवू नयेत. देवघराच्या वरती-खाली काहीही सामान ठेवू नये.

* स्नान करण्यापूर्वी पाण्यात काही थेंब लिंबाचा रस टाकून घ्या.

## सल्ला

सूप बनविण्यासाठी टोमॅटो फ्रीजमध्ये ठेवा. जेव्हा ते सोलावयाचे असतील तेव्हा त्यावर गरम पाण्याची धार सोडा. टोमॅटोची साल मऊ होईल व ते सोलणे सोपे जाईल. टोमॅटोने शरीरातील रक्त वाढते त्याचप्रमाणे त्वचेचा रंग उजळतो आणि हिमोग्लोबीनही मोठ्या प्रमाणात वाढते.

## सौंदर्य

रुक्ष त्वचेवरील डाग हटवण्यासाठी दुधात चंदन उगाळून लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २० सप्टेंबर २०२५

**चतुर्दशी श्राद्ध, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, मघा ०८।०६, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : स्वजनांशी भेट घडेल. विषयावर वाद संभव आहे. सामाजिक कामात सक्रिय भागीदारी. तब्बेत सांभाळा. आर्थिक लाभ. भाजणे, कापण अशा गोष्टी होण्याची शक्यता.

**वृषभ** : शासकीय स्त्रोतांकडून धन प्राप्तीचा योग. आर्थिक प्रकरणात विशेष अनुसंधान योग. घरात मंगल कार्य होतील.

**मिथुन** : पैश्यासंबंधी वाद सोडविण्यासाठी भाग्यवर्धक यश प्राप्ति योग. आर्थिक क्षेत्रात अनुसंधान संबंधी योग. वडीलोपार्जीत मालमत्तेचे व्यवहार पूर्ण होतील.

**कर्क** : सुखद वातावरण राहील. आरोग्याकडे लक्ष द्या. वादांपासून लांब रहा. मुलांकडून सुखद बातमी कळेल.

**सिंह** : अडकलेली कामे पूर्ण होतील. घरासाठी मौल्यवान वस्तू खरेदी कराल. आकस्मिक लाभ. ईच्छा नसतानाही लांबचा प्रवास करावा लागेल.

**कन्या** : आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना मनाची एकाग्रता साधता येईल. आध्यात्मिक चेतना मिळेल. वादंग होण्याची शक्यता असल्यामुळे शांत राहावे. कोर्ट-कचेऱ्या यांपासून लांब रहा.

**तूळ** : सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. आत्मविश्वास हीच यशाची गुरुकिल्ली असते.

**वृश्चिक** : आलेली संधी न गमावणे हे तुमच्या यशाचे रहस्य. स्वप्ने पूर्ण होतील. अविवाहितांसाठी लग्नाचे प्रस्ताव. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु** : व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर करा. स्पर्धा, पैजा जिंकू शकाल. लाभ होईल.


**मकर** : धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल. अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल. आई-वडीलांचा व वडीलधाऱ्यांचा सन्मान करा.

**कुंभ** : कामात यश सुनिश्चित. सजावटीच्या वस्तु खरेदी कराल. चांगल्या घटना घडतील. लांबलेल्या प्रकरणात यश. वाहने व उपकरणे जपून वापरावीत.

**मीन** : दिवस धावपळीचा असेल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. मुले व पत्नी यांच्या सहवासामुळे आरोग्य उत्तम राहिल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२६६ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** नियम म्हटला की हा आलाच, नियमाला बाधक गोष्ट ५) शरीर, तन, देह ६) 'विच्छा माझी पुरी करा' या विनोदी नाटकाचे लेखक ८) वडील, बाप, पिता, जनक ९) पदार्थाचा उडालेला तुकडा १२) एक मराठी आडनाव, महाराष्ट्रातील प्रसिद्ध गुरुजी (आडनाव) १३) एकंदरीत, निवड न करता १४) हया, लज्जा, लाज १५) वकिलाचा व्यवसाय, वकिली १९) ओढा, रोख २०) अगदी अशक्त, लेचापेचा, काटकोळा २१) डावा, वाईट

**उभे शब्द :-** १) देवादिकांचे अन्य रुपाने पृथ्वीवर येणे २) आवडलेले, मान्य ३) दिवा लावण्यसाठी बनविलेली कापसाची सुरळी ४) या सणाला सोने म्हणून आपट्याची पाने एकमेकांना देऊन शुभेच्छा दिल्या जातात ५) कडक पाठ असलेला एक जलचर ७) टापटीप, साफसूफ १०) कवीची रचना, कविता, कवन ११) अत्युच्च, सर्वोच्च १२) ओढा वगैरेवर बांधलेला तात्पुरता पूल १३) टोळीचा प्रमुख १६) अंगावरुन वारे जाणे, अर्धांगवायू, पक्षघात १७) फार बारीक व मऊ १८) अगदी गरीब, दरिद्री

### शब्दगंध क्र. ७२६५ चे उत्तर



### फिल्मीचक्कर क्र. १२०६ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : कर्तृत्वाने कल्पकतेची जोड मिळाली म्हणजे अद्भुत कार्ये घडतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कर्करोग म्हणजे काय?

'कर्करोग' हा शब्द ऐकताच रुग्णाची पाचावर धारण बसते. इतकी भयंकर स्थिती असण्याचे कारण काय? कर्करोग झालेला माणूस जास्त दिवस जिवंत राहत नाही हेच या भीतीचे कारण असते. या कर्करोगाला इतके घाबरायची खरंच गरज आहे का, ते आता पाहू.

सामान्यपणे कर्करोग हा वयस्कर व्यक्तींचा रोग आहे. आपल्या देशात दर हजार लोकसंख्येत एक व्यक्ती कर्करोगग्रस्त आहे. म्हणजेच प्रत्येक खेडेगावात एक तरी रुग्ण सापडेलच. पुरुषांमध्ये जीभ, तोंड, घसा, स्वरयंत्र, अन्ननलिका व जठर, प्रोस्टेट ग्रंथी, गुदाशय व मोठे आतडे, श्वसनसंस्था व फुफ्फुसे तसेच यकृत या भागाचे कर्करोग प्रामुख्याने होतात. स्त्रियांमध्ये गर्भाशयाचे तोंड, स्तन, अन्ननलिका व जठर, स्त्रीबीजांड, तोंडाचा अंतर्भाग, जीभ, गुदाशय, तसेच फुफ्फुसे व श्वसनसंस्था यांचे कर्करोग होतात. भारतातील कर्करोगाच्या एकूण रुग्णांपैकी ५०% रुग्ण तोंडाचा अंतर्भाग, घसा व गर्भाशयाचे तोंड या भागांशी संबंधित असतात. शरीरातील पेशींची संख्या नेहमी वाढत असते, पण त्यावर नियंत्रण असते. त्यामुळे त्या वाढीचे दुष्परिणाम होत नाहीत. तसेच जठरात फुफ्फुसाच्या पेशी वाढत नाहीत, तर यकृतात हाडांच्या पेशी वाढत नाहीत.

कर्करोगात पेशींची अनियंत्रित अशी वाढ होते व लिंफ वाहिनीतून वा रक्तवाहिनीतून या पेशी इतर इंद्रियापर्यंत पोहोचून तेथे रुजतात व वाढायला लागतात. वाढ खूप झाल्यास इंद्रियाभोवतीच्या रक्तवाहिन्या, दुसरे अवयव यांच्यावरही त्या आक्रमण करतात व त्यांना हानी पोहोचते.

कर्करोग होण्याची अनेक कारणे आहेत. काही रासायनिक पदार्थाशी संबंध येणे, किरणोत्सर्गी पदार्थांशी संबंध येणे, एखाद्या जागी सतत घर्षण होणे, काही विषाणूंचा संसर्ग होणे, आनुवंशिकता व व्यसने ही कर्करोगाची प्रमुख कारणे होत. कर्करोग झाला आहे, हे ओळखण्यासाठी काही लक्षणे उपयुक्त ठरतात.

यात वजन अचानक खूप कमी होणे, भूक न लागणे, शरीरात कोठेही अचानक गाठ येणे वा न बरा होणारा व्रण तयार होणे, उतारवयात मासिक पाळी थांबल्यानंतर सवयीत बदल होणे तसेच लघवी, शौचमार्ग व नाक, तोंड, कान यांतून अचानक रक्तस्राव होणे इत्यादींचा समावेश होतो.

कर्करोगाचे निदान लवकर झाल्यास रुग्ण वाचू शकतो. मुख्य म्हणजे त्याचे आयुष्य वाढते. कर्करोग असेल म्हणून घाबरून काही लोक डॉक्टरांना दाखवतच नाहीत. हे बरोबर नाही. काही कर्करोग शस्त्रक्रियेने, तर काही किरणोपचाराने व औषधांनी बरे होतात. निदान व्यक्तीचा मृत्यू टाळता येतो व त्याचे आयुष्य वाढवता येते. फक्त निदान लवकर व्हायला हवे.

### लांडगा आणि सिंह

एकदा सिंह महाराज खूप आजारी पडले. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी दररोज कोणी ना कोणी त्यांच्याकडे हजेरी लावत असे. अरण्यातील सर्व पशू आलटून-पालटून सिंहाच्या दरबारात येत असताना कोल्होबा मात्र आजपर्यंत तिकडे फिरकला नव्हता. असे असता कोल्हा अजून आला नाही, हे लांडग्यास समजले. कोल्ह्याचे आणि लांडग्याचे मुळीच पटत नसे. ते एकमेकांचे वैरी झाले होते. या संधीचा फायदा घेऊन कोल्ह्याला चांगली अद्दल घडवावी, असे लांडग्याला वाटले. झाले! त्याने सिंहाचे कान भरले. लांडगा सिंहास म्हणाला, ''महाराज, आपण आजारी पडल्यापासून आजपर्यंत सर्व पशू आपल्या समाचाराला आले; पण कोल्होबा अजून एकदाही आपली विचारपूस करण्यास आला नाही. तो आपल्याविरुद्ध काही तरी कारस्थान करीत असावा, असे मला वाटते.''

लांडग्याचे हे बोलणे ऐकताच

'कोल्होबाने ताबडतोब महाराजांना भेटायला यावे' असे फर्मान महाराजांनी काढले. कोल्ह्याला बोलावणे गेले. तो दरबारात हजर झाला असता सिंह महाराज म्हणाले,

''काय रे उर्मटा, मी इतका आजारी झालो असताना आजपर्यंत तू एकदाही मला भेटायला आला नाहीस, त्याचे काय कारण?''

यावर कोल्हा म्हणाला, ''महाराज, मी आपल्याच कामगिरीवर होतो. इतके दिवस आपल्यासाठी एखादा चांगला वैद्य शोधत फिरत होतो. आता कालच मला एक मोठा नावाजलेला वैद्य भेटला आणि त्याने मला सांगितले की, नुकतंच काढलेलं ताजं लांडग्याचं कातडं पांघरलं असता आपला आजार संपूर्णपणे बरा होईल.''

कोल्ह्याची थाप सिंहाला खरीच वाटली. त्याने कातडे मिळविण्यासाठी एका फटक्यातच जवळ उभ्या असलेल्या लांडग्याला ठार केलं.

**तात्पर्य** : दुसऱ्याचा नाश करायला टपलेले लोक स्वतःच विनाशाच्या गर्तेत सापडून नाश पावतात.

## जीवन का अमृत (भाग १)



वह हट जाए। फिर वे हमें एक मर्यादा का जीवन, जैसा कि वेदों में बताया है, व्यतीत करने को कहते हैं। जब ये सभी गुण हमारी जिंदगी का हिस्सा बन जाते हैं, तो उससे हममें विवेक जाग उठता है, हममें power of discrimination (विवेक) आ जाती है, हमें यह मालूम हो जाता है कि सही क्या है और गलत क्या है। और जब हमारी समझ में आ जाए कि सही बोल क्या हैं, सही कार्य क्या हैं, सही विचार क्या हैं, तो हमारा ध्यान प्रभु की ओर होगा और हमें यह समझ में आ जाएगा कि प्रभु के सिवाय, परमात्मा के सिवाय कोई चीज़ स्थायी नहीं है। यह दुनिया, जिसमें हम सब जी रहे हैं यह एक माया की दुनिया है, माया का जाल है। हमें इन आँखों से सब कुछ असली दिखाई देता है, लेकिन यह एक illusion है, 'माया' का एक धोखा है। माया लफ़्ज़ का मतलब यही है कि जो बाहर से कुछ और हो और अंतर से कुछ और हो।

### गुरू और परमात्मा

जब हममें discriminate करने की शक्ति आ जाती है, जब हम में विवेक आ जाता है, तो फिर हम वैराग की अवस्था में जाना शुरू हो जाते हैं, दुनिया से हमारा लगाव कम होने लगता है क्योंकि हमारा लगाव परमात्मा से होने लगता है, प्रभु से लगाव होना शुरू हो जाता है। प्रभु को इन आँखों से किसी ने नहीं देखा है, तो उससे लगाव कैसे हो, हमारा उद्धार कैसे हो, उसके बारे में स्वामी जी महाराज हमें दूसरी पंक्ति में समझा रहे

**नाम बिन कभी न होय उधार ।।**

नाम और नामी में कोई भेद नहीं है। नाम और परमात्मा में कोई भेद नहीं है। धर्मग्रंथों में यही आया है कि शुरू में प्रभु एक थे और उनके साथ शब्द था और शब्द ही परमात्मा था। वह शब्द क्या है ? वह प्रभु से उत्पन्न हुई शक्ति है जिसके आधार पर सृष्टि चल रही है, जिसके आधार पर सभी खंड-ब्रह्मंड चल रहे हैं। उसे शब्द कहा जाए, नाम कहा जाए, Logos कहा जाए, Sonorous Light कहा जाए, कलमा कहा जाए, ये सभी उस शक्ति के अलग-अलग नाम हैं और स्वामी जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि जब तक हम नाम से नहीं जुड़ेंगे, हमारा उद्धार नहीं हो सकता। वे परा-विद्या की बात कर रहे हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

बीज संस्कार २० किलो बीज को बीजामृत से भिगो दें और ऊपर से पहले ट्रायकोडर्मा फफूंदी रोधक १०० ग्राम, फिर रायझोबियम २५० ग्राम और पी.एस.बी. जीवाणु संवर्धक प्रति २५० ग्राम का लेप चढ़ाकर बीज को छांव में सूखने दें। आठ-दस घण्टे के अंदर जमीन गीली हो तब बीज बुवाई करें। फसल संरक्षण (इसके लिए मूंगफली संरक्षण का ही फार्मुला प्रयोग करें।)

**६) तुअर की फसल :**

जमीन को शक्तिशाली बनाने के लिए (इसके लिए ज्वारी जमीन को शक्तिशाली बनाने का ही फार्मुला प्रयोग करें।) मिक्स फसल दो लाइन तुअर की और चार लाइन ज्वारी या मूंगफली या सोयाबीन या मूंग या उड़द इनमें से एक मिक्स करना आवश्यक है। बीज संस्कार २० किलो बीज को बीजामृत से भिगो दें और ऊपर से रायझोबियम और पी.एस.बी. जीवाणु संवर्धक प्रति २५० ग्राम का लेप चढ़ाकर बीज को छांव में सूखने दें। आठ-दस घंटे के अंदर जमीन गीली हो तब बीज बुवाई करें।

### आज्ञा चक्र

**फसल संरक्षण -**

१. इल्लियां, सूत्रकृमी और मर रोग के नियंत्रण के लिए तुअर में ज्वारी मिक्स करना आवश्यक है ।

२. फल-फूल लगने शुरू होते ही कीट के नियंत्रण के लिए ४% गोमूत्र या ५% नीम अर्क या दशपर्णी अर्क हफ्ते में एक बार अदली-बदली कर छिडकाएँ ।

३. एक एकड फसल में १२-१५ लकडियों का एन्टीना (टी साइज का) बनाकर लगाइये, जिस पर पंछी बैठने से कीट का नियंत्रण होता है ।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा - किती वेळा सांगितले... स्वयंपाक करताना मोबाईल मध्ये तोंड खुपसून स्वयंपाक नको करत जाऊस, आमटी अगदी पाण्या सारखी फिक्की आहे.

बायको - तुम्हाला किती वेळा सांगितले की मोबाईलमध्ये तोंड खुपसून जेवत जाऊ नका तुम्ही पाण्याच्या ग्लासात पोळी बुचकळून खात आहात.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताच्या कोणत्या स्वदेशी विमानवाहू जहाजाने यशस्वी चाचणी केली आहे? - आय.एन.एस. विक्रांत

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

**ब) अत्यार्तव** (Menorrhagia) -

अत्यार्तव ही अवस्था सहसा नेहमीच्या मासिक पाळीबरोबर सुरू होते. यामध्ये रक्तस्रावाचे प्रमाण नेहमीपेक्षा जास्त असते किंवा पुढील मासिक पाळी ही २१ दिवसांच्या आतच सुरू होते. रक्तस्राव नेहमीपेक्षा जास्त दिवस होतो. म्हणून या अवस्थेस अत्यार्तव असे म्हणतात.

**आर्तवं (रजःवृद्ध) अंगमर्द अतिप्रवृत्तिं दौर्गधं च।।**

(१ सु.सु. १५-१६)

या व्याधीत खूप रक्तस्राव होतो. त्याला दुर्गंधी असते, अंग अतिशय दुखते. त्याचबरोबर अति रक्तस्रावाचा परिणाम म्हणून थकवा, रक्त कमी होणे, अशक्तपणा ही लक्षणे दिसतात.

आयुर्वेदामध्ये अत्यार्तव हा व्याधी रक्तप्रदर किंवा अधोग रक्तपित्त याच्यामध्ये एक लक्षण स्वरूपात दिसून येतो, असे सांगितले आहे. आम्ल, उष्ण, अतितिखट, लवणयुक्त विदाही असे पदार्थ आहारात खाल्ल्याने शरीरामध्ये पित्तप्रकोप होतो. पित्ताचे स्थान असलेल्या रक्तधातूची दुष्टी होते. त्यामुळे रक्ताचा उपधातू असलेला रज म्हणजेच मासिक पाळीचे प्रमाण वाढते.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**खालील विकारामध्ये अत्यार्तव (अति रक्तस्राव) आढळतो :**

अ) जननेंद्रियांमध्ये दोष

ब) मानसिक ताणतणाव

क) संततिप्रतिबंधक साधने

ड) अंतःस्रावी ग्रंथींचे विकार

ई) गर्भाशय कार्य विकृतीमुळे होणारा रक्तस्राव (Disfunctional Uterine Bleeding)

**अ) जननेंद्रियांमध्ये दोष :**

गर्भाशय आणि बीजकोषांमध्ये गाठी उद्भवल्या तर अत्यार्तव होतो. गर्भाशयाच्या स्नायूतील गाठी किंवा गर्भाशयाच्या आतील अस्तरातील गाठींचा आकार बऱ्याच वेळेला मोठा होतो. तरीसुद्धा वेदनेचा त्रास जाणवत नाही. फक्त रक्तस्राव जास्त होतो. सोनोग्राफी केली असता ही बाब लक्षात येते. अशाच प्रकारे बीजकोषांमधील गाठीचा आकारदेखील खूप मोठा असू शकतो.

हार्मोन्सच्या असंतुलनामुळे गर्भाशयाचे अस्तर आपल्या जागेबरोबरच गर्भाशयाचे स्नायू, बीजकोष, योनी या अवयवांवरही वाढते. यालाच एंडोमेट्रिओसिस (Endometriosis) असे म्हणतात. यामध्ये देखील रक्तस्रावाचे प्रमाण वाढते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारणसभा खेळीमेळीत झाली. याप्रसंगी संचालक.

# मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

## सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर

नगर - अहमदनगर मिरची मर्चन्ट नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा १२ सप्टेंबर रोजी सौजन्यशील भूमिकेतुन झाली. सुत्रसंचालन सीए किरण मनियार यांनी केले.

या संस्थेच्या सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन गोविंद मनियार हे होते. सभेपुर्वी ज्ञात अज्ञात सभासदांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

संस्थेच्या वार्षिक सभेच्या विषय पत्रिकेचे वाचन व्यवस्थापक दिपक दरेकर यांनी केले. त्या विषय पत्रिकेनुसार सर्व विषय आवाजी भूमिकेतून मंजूर करण्यात आले. संस्थेचे संचालक सीए किरण मनियार यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे संयमशील वृत्तीने दिली.

तसेच सभेच्या अध्यक्षांनी सभांसदाना १५ % लाभांश जाहीर केला. तसेच लक्ष्मिकांत झंवर, गोपाळ मनियार यांनी संस्थेला योग्य मार्गदर्शन केले.

सभेस, रसिकलाल गुगळे, हनुमान खंडेलवाल, किसनलाल बंग, संजय लुकंड, सत्यनारायण बंग, पुरुषोत्तम नावंदर, देवकिसन मनियार इत्यादी हजर होते. सभेस सभासदांची उपस्थिती लक्षणीय होती. सदर सभा हि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेच्या व्हा.चेअरमन सौ.प्रिया फिरोदिया यांनी सभासदांचे आभार मानले.

# शहरातील चांदणी चौकाचे महर्षी वाल्मीक महाराज चौक असे नामकरण करा

## अखिल भारतीय वाल्मीक समाज संघटनेची महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी



चांदणी चौकाचे महर्षी वाल्मीक महाराज चौक असे नामकरण करा, या मागणीचे निवेदन अखिल भारतीय वाल्मीक समाज संघटनेच्यावतीने महापालिका आयुक्तांना देण्यात आले. (छाया - लहू दळवी)

नगर - शहरातील चांदणी चौक हे अधिकृत नाव नसून याला कुठलाही इतिहास नाही. हा राष्ट्रीय महामार्ग असून या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने या चौकाचे नामांतर करून महर्षी वाल्मीक महाराज चौक असे नामकरण करावे. मुघलांनी आपली मंदिरे तोडली आणि अहिल्याबाई होळकर यांनी मंदिरांची उभारणी केली आहे, त्यांचे नाव आपल्या जिल्ह्याला देण्यात आले असून आयुक्तांनी तातडीने महासभा बोलून चांदणी चौकाच्या नामांतराचा विषय मंजूर करावा, अशी मागणी अखिल भारतीय वाल्मीक समाज संघटनेने निवेदनाद्वारे महापालिकेच्या आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली

शहरातील चांदणी चौकाला महर्षी वाल्मिक महाराज चौक असे नामकरण करावे, अशा आशयाचे निवेदन अखिल भारतीय वाल्मीक समाज संघटनेच्या वतीने आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केले. यावेळी आमदार संग्राम जगताप, जिल्हाध्यक्ष सनी खरारे, जिल्हा उपाध्यक्ष राहुल लखन, जिल्हा सचिव अर्जुन चव्हाण, जिल्हा सचिव संतोष सारसर, जिल्हा उपसचिव पापा चोहान महाराज, जिल्हा उपसचिव संदीप लखन, नगर शहर अध्यक्ष रोहन चावरे, अजय सौदे, अनिल तेजी, अनिल वाणे, रविंद्र मोरकरोसे, राजेश चव्हाण, अनिल मटू, राजेश बैद, अभिषेक भगवाने, राजु चव्हाण, संदिप करोलिया, कुणाल बैद, आकाश कुडीया, नरेश चव्हाण, रोहित बागडी, शुभम लोट आदी उपस्थित होते

निवेदनात पुढे नमूद केले की, अहिल्यानगर शहरातील चांदणी चौकाचे नाव बदलून महर्षी वाल्मिकी चौक नामकरण करण्यात येवून महर्षी वाल्मिक यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. महर्षी वाल्मिकी महाराज यांचा जीवन प्रवास आपल्या सर्वासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे, त्यांचा जीवन प्रवास, कार्य, वाडमय आहे. त्यांची माहिती आपल्या पुढच्या पिढीसाठी पोहचविणे हे आपले कर्तव्य आहे. याकरिता चांदणी चौकाचे नाव बदलून महर्षी वाल्मिकी चौक करून त्या ठिकाणी पाटीचे व पूर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा अशी मागणी समस्त अखिल भारतीय वाल्मिकी समाज संघटना व अहिल्यानगर जिल्ह्यातील समस्त मेहतर-वाल्मिकी समाज बांधवानी केली.





नागरदेवळे गावातील स्मशानभूमीसाठी जिल्हा परिषदेकडून निधी प्राप्त होवून त्याचे काम मार्गी लागले असून, ग्रामस्थांना व्यवस्थितपणे अंत्यविधी करता येणार आहे.

# नागरदेवळे स्मशानभूमीचे रुप पालटले, पावसाळ्यातही करता येणार अंत्यविधी

## जालिंदर बोरुडे यांच्या पाठपुराव्याला यश

नगर - नगर तालुक्यातील नागरदेवळे गावातील स्मशानभूमीची दयनीय अवस्थेचे अखेर रुप पालटले. जालिंदर बोरुडे यांनी यासंदर्भात सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर जिल्हा परिषदेकडून स्मशानभूमीसाठी निधी प्राप्त होवून त्याचे काम मार्गी लागले असून, ग्रामस्थांना व्यवस्थितपणे अंत्यविधी करता येणार आहे.

नागरदेवळे गावातील स्मशानभूमीची दयनीय अवस्था निर्माण झाल्याने अंत्यविधी करण्यास गंभीर अडचणी निर्माण होत होत्या. पावसाळ्यात अंतयात्रा सभा मंडपात थांबवून पाऊस थांबल्यानंतर अंत्यविधी केले जात होते. या प्रश्नाकडे जालिंदर बोरुडे यांनी आवाज उठवून जिल्हा परिषदकडे निधीची मागणी केली होती.

सातत्याने केलेल्या पाठपुराव्याने जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, उपाभियंता यांनी तातडीची गरज ओळखून तांत्रिक मंजूरी व निधी उपलब्ध करुन दिला. जिल्हा परिषद प्रशासनाने १४ लाख रुपयांच्या कामाचे वर्क ऑर्डर काढून कार्यरंभाचे आदेश दिले होते. तरी देखील ग्रामपंचायतच्या ढिसाळ कारभारामुळे एक महिना उलटूनही काम सुरु न झाल्याने त्यांनी ग्रामपंचायतीला टाळे ठोकण्याचा इशारा दिला होता. यानंतर खडबडून जागे झालेल्या ग्रामपंचायत प्रशासनाच्या माध्यमातून स्मशानभूमीत पत्र्याचे शेड नव्याने बसवून पेव्हिंग ब्लॉक, प्रवेशद्वार व पथदिव्यांचे काम करण्यात आले आहे. तसेच बसण्यासाठी ओट्यांची व्यवस्था व पाण्याच्या टाकीचे काम देखील लवकरच पूर्ण होणार असल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले असल्याची माहिती जालिंदर बोरुडे यांनी दिली.

गेल्या दोन ते तीन वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित होता. शेडसह स्मशानभूमीत बसण्याची व्यवस्था, रात्री प्रकाश नसल्याने आणखी अडचणी निर्माण होत होत्या. अशा दुःखद प्रसंगी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत होते. स्मशानभूमीचा प्रश्न सुटल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# आंतरराष्ट्रीय शांतता दिनानिमित्त २१ सष्टेंबर रोजी विश्वशांतीसाठी ऑनलाईन लाईव्ह संघटीत मेडिटेशन



नगर - रोटरी क्लब ऑफ अ.नगर व ब्रह्माकुमारीज्च्या पुढाकाराने विविध सामाजिक संस्थेच्या सहकार्याने डॉ. सुधा कांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय शांतता दिनानिमित्त विश्वशांतीसाठी ऑनलाईन लाईव्ह संघटीत मेडिटेशन २१ सष्टेंबर रोजी सकाळी ८ ते ८.३० या वेळेत होत आहे. हजारोंच्या संख्येनी सहभागी होण्याचे आवाहन रोटरी क्लब ऑफ अ.नगरचे अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी केले आहे. यामध्ये जगातील प्रत्येक व्यक्ती सहभागी होऊ शकतो. जितके अधिक लोक सहभागी होतील तितका दैवी, सकारात्मक स्पंदनांचा प्रसार संपूर्ण विश्वभर होईल. आपण ही लिंक https://youtube.com/live/vQzšokTe4ms?feature=share इतर संस्थांमध्येही शेअर करून त्यांनाही सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे, असे सुहास क्षीरसागर यांनी सांगितले.

मेडिटेशनमध्ये सहभागी होण्याविषयी फायदे सांगतांना डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या मेडिटेशनमधून निर्माण होणारी सकारात्मक, दैवी ऊर्जा सर्वप्रथम तुम्हाला, तुमच्या घराला आणि कुटुंबियांना लाभदायी ठरेल. तुमच्याकडून निघणारी स्पंदने (किरणे) विश्वभर पसरतील, अनेक पटींनी वाढून परत तुमच्याकडे येतील- यामुळे तुम्हाला दुप्पट लाभ होईल. जगाच्या शांततेसाठी ध्यान हा अत्यंत पवित्र उपक्रम आहे. त्याचे पुण्यफल निश्चितपणे तुम्हाला लाभेल. याच्यामध्ये समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती व रोड अपघात कमी झाल्याचे संशोधन सांगते.

सहभागी कसे व्हावे याबद्दल निलेश वैकर व पुरूषोत्तम जाधव यांनी माहिती सांगितली. २१ सष्टेंबर रोजी सकाळी ७.५५ वाजता दिलेल्या लिंकवर क्लिक करा. तेथे मिळालेल्या सूचना अनुसरून शांतपणे एकाच ठिकाणी बसून मेडिटेशन करा. अर्ध्या तासाचे हे मेडिटेशन संपल्यानंतर ई-सर्टीफिकिटही प्राप्त होणार आहे. यामध्ये सर्व रोटरी क्लब डिस्ट्रीक्ट ३१३२, सर्व इनरव्हिल क्लब डिस्ट्रीक्ट ३१३, ब्रह्माकुमारीज्, साईबन में मधुबन, एम के सी एल असो. अ.नगर, जि.प. शिक्षक संघटना अ.नगर, शासकिय तंत्रनिकेतन अ.नगर, जैन सोशल फेडरेशन अ.नगर- आनंदऋषीजी हॉस्पिटल सर्व डॉक्टर्स आणि स्टाफ, स्नेहालय, अवतार मेहरबाबा स्पिरिच्युअल सेंटर अ.नगर यांचे सहकार्य लाभले आहे. या ऑनलाईन लाईव्ह संघटीत मेडिटेशमध्ये सहभागी व्हावे. अशी माहिती डॉ. प्रकाश कांकरिया आणि सचिव संदीप ठोंबे यांनी दिली. अधिक माहितीसाठी ९८५०८८७८३८ प्रिया दिदी येथे संपर्क साधावा.




जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत माउंट लिटरा झी स्कूलच्या विद्यार्थीनीची उत्कृष्ट कामगिरी केली.

# माउंट लिटरा झी स्कूलच्या विद्यार्थीनींची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत उत्तम कामगिरी

नगर - माउंट लिटरा झी स्कुलची विद्यार्थिनी कु. योशना मंडलेचा हिने जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत उत्तम कामगिरी केली. कु. योशना जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत तब्बल ८० हून अधिक स्पर्धकांवर मात केली आणि आता ती झोनल स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. या व्यतिरिक्त कु.आरवी मंडोरे आणि कु. मिष्टी बालानी या दोघींनी देखील आपली कौशल्य दाखवत अनुक्रमे सातवा आणि आठवा क्रमांक पटकावला.

स्कुलच्या वतीने संस्थेच्या संचालिका सौ. स्वाती कानडे व मुख्याध्यापिका यास्मिन काझी यांनी योशना मंडलेचा, आर्वी मंडोरे व मिष्टी बालानी या विद्यार्थिनींचे कौतुक आणि सत्कार केला. या विद्यार्थीनीना शाळेचे क्रीडाशिक्षक प्रशांत पाटोळे व अक्षय चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

# तालवादक ऋषिकेश कुलट यांच्या संगीत कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



तालवादक ऋषिकेश कुलट यांच्या संगीत कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

नगर - स्वरांकित म्युझिक ॲकॅडमीच्या वतीने नगरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ५ दिवसीय मोफत संगीत कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. १० ते १४ सप्टेंबर दरम्यान झालेल्या या कार्यशाळेत तबला, ढोलक, ढोलकी, पखावज, ऑक्टोपॅड, गिटार, कीबोर्ड, हार्मोनियम यांसारख्या विविध वाद्यांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. या कार्यशाळेत तब्बल २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना संगीताच्या तांत्रिक बाबींबरोबरच दैनंदिन जीवनातील शिस्त, सातत्य, रियाज आणि स्टेजवरील आत्मविश्वास याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

ॲकॅडमीचे संचालक तालवादक ऋषिकेश कुलट यांनी संगीत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना, मुलांमध्ये वाढत चाललेला मोबाईलचा अतिरिक्त वापर व त्याचे होणारे दुष्परिणाम यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, संगीत हे फक्त छंद न राहता करिअरचा पर्याय बनू शकते. प्रत्येक मुलामध्ये काहीतरी कला दडलेली असते, ती पालकांनी वेळेवर ओळखून योग्य दिशेने प्रोत्साहन दिले तर मुलांचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते.

कार्यशाळेत कृतिका बेलेकर यांनी सिने-सुगम संगीत आणि शास्त्रीय संगीत या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शब्दोच्चार, गाण्यातील भावना, काव्यवाचन, गाण्यातील विरामचिन्हांचा वापर, आवाजाची काळजी, आवाजाचा व्यायाम, दररोजचा रियाज, स्टेज सादरीकरण आणि रेकॉर्डिंग अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासहित प्रशिक्षण देण्यात आले. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आणि संगीताकडे गंभीर दृष्टीकोनाने पाहण्याची वृत्ती निर्माण झाली.

संगीताच्या क्षेत्रात 'हर घर संगीत' हे ध्येय ठेवून कार्यरत असलेल्या ऋषिकेश कुलट यांची महाराष्ट्रात एक युवा, प्रयोगशील व समर्पित कलाकार म्हणून वेगळी ओळख आहे. १ लाख लोकांना संगीत शिकवण्याचे त्यांचे ध्येय असून, नगरमध्ये ते सातत्याने विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संगीताची गोडी वाढवत आहेत.

# डिजिटल जगात अटेन्शन स्पॅन वाढविण्यासाठी कॅलिग्राफी शिकणे काळाची गरज

## राहुल बांगर यांचे प्रतिपादन

नगर - डिजिटल युगात स्क्रीन पाहण्यामुळे मुलांचा अटेन्शन स्पॅन अर्थात एकाग्रता कमी होत आहे, काही विद्यार्थ्यांना अगदी एक मिनिटेही स्थिर ठेवणे पालकांसाठी आव्हान झाले आहे. या समस्येला सोडवण्यासाठी विद्यार्थी एकाग्रता वाढवून त्यांना लेखन कलेची आवड निर्माण करणे आवश्यक आहे. या लेखन कलेतील कलात्मक विषय म्हणजेच कॅलिग्राफी होय. कॅलिग्राफीच्या माध्यमातून मुलांची एकाग्रता वाढते, हे लक्षात घेऊन हिंद सेवा मंडळाचे मेहर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुरिता झगडे यांनी शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी खास कॅलिग्राफी हा विषय सुरू केला आहे. या अभिनव उपक्रमाचे महास्कील संस्थेच्या वतीने कौतुक करून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मोफत कॅलिग्राफी लेखन साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव मिळून त्यांची अटेन्शन स्पॅनची समस्या दूर होऊन ते एक सर्जनशील नागरिक बनतील असा आशावाद महास्कील संस्थेचे संचालक राहुल बांगर यांनी व्यक्त केला.

नगर शहर परिसरात हिंद सेवा मंडळाचे मेहर इंग्लिश स्कूल नेहमी अभिनव उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत असते, ठराविक विषयातील तज्ञांना बोलवून विध्यार्थी अक्षर समजून घेऊन त्यानुसार त्यांच्या स्वभावातील समस्या हेरण्यासाठी मानस शास्त्रीय वर्ग देखील घेण्यात येतात आणि पुढेही शाळा विकासासाठी असे आणखी अभिनव उपक्रम घेणाचा आमचा मानस आहे असे प्रतिपादन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुरिता झगडे यांनी केले.



कॅलिग्राफी साहित्याचे विद्यार्थ्यांना वितरीत करताना डावीकडून मुख्याध्यापिका श्रीमती अनुरिता झगडे, दीपक शिंदे, महास्कील संस्थेचे संचालक राहुल बांगर, कार्यक्रम व्यवस्थापक अभिजित चिंतामणी इत्यादी.

## मेहर इंग्लिश स्कूलमध्ये 'महास्कील' तर्फे कॅलिग्राफी साहित्य वाटप

याप्रसंगी हस्ताक्षर तज्ञ साक्षी मुनोत देखील उपस्थित होत्या, त्यांनी विद्यार्थ्यांना कॅलिग्राफी विषयातील करियर संधी बाबत मार्गदर्शन केले. लहान वयात कॅलिग्राफी शिकण्याने मुलांचा मानसिक तणाव कमी होऊन त्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो.

या उपक्रमाला शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सुंदर हस्ताक्षराची आवड निर्माण करणे, लेखनकलेचा प्रसार करणे आणि एकाग्रता वाढवणे हा होता. कॅलिग्राफी शिकण्याने विद्यार्थ्यांना कौशल्य स्पर्धा परीक्षांमध्ये तसेच भविष्यातील शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात उपयोगी होईल, असे अध्यक्षीय भाषणात दीपक शिंदे यांनी नमूद केले. त्यांनी सांगितले कि, सुंदर लेखन ही फक्त कला नाही, तर आत्मविश्वास वाढवणारे शस्त्र आहे. कॅलिग्राफीचा सराव केल्याने विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर आकर्षक बनते आणि त्यांची व्यक्त होण्याची क्षमता सुधारते.

कॅलिग्राफी साहित्य मिळाल्याने विद्यार्थी अतिशय आनंदी झाले. अनेक विद्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त करताना आता आम्ही नियमितपणे लेखनाचा सराव करून शालेय उपक्रमांमध्ये भाग घेऊ, असे सांगितले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना या संधीचा योग्य फायदा करून घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी मेहरइंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी 'महास्कील' संस्थेचे आभार मानले. त्याचप्रमाणे शहरातील इतर गरजू विद्यार्थ्यना मदत करण्यासाठी संस्थेच्या ९०११९९३७०० क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन महास्कील संस्थेचे कार्यक्रम व्यवस्थापक अभिजित चिंतामणी यांनी केले.

यावेळी कार्यक्रम समन्वयक संगीता वल्लाकट्टी, सत्यश्री चिल्का, विमल आवारे, भारती खांडेकर, आशा घोरपडे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका उषा भालेराव यांनी केले. या उपक्रमाला महास्कील संस्थेचे सहसंस्थापक तेजल कांबळे, शाळेचे चेअरमन जगदीश झालानी तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष, मानद सचिव, कार्याध्यक्ष व सर्व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.



छावनी परिषदेच्या पीएमश्री शाळेची अनुष्का साठे 'इतिहास महाराष्ट्राचा' महाअंतिम फेरीची विजेती ठरली.

# छावनी परिषदेच्या पीएमश्री शाळेची अनुष्का साठे 'इतिहास महाराष्ट्राचा' महाअंतिम फेरीची विजेती

भिंगार - बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के यांच्या संकल्पनेतून बालरंगभूमी परिषदेने 'इतिहास महाराष्ट्राचा श्रीशिवजन्मोत्सव ते श्रीशिवछत्रपती राज्याभिषेक या उपक्रमाचे आयोजन केले होते. राज्यभरात २६ विभागांमध्ये प्राथमिक फेरी झाली. प्राथमिक फेरीतील सात हजारांहून अधिक बालकलाकारांमधून निवडलेल्या प्रथम स्पर्धकांनी महाअंतिम फेरीत आपापली कला सादर केली.

यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल मुंबई येथे पार पडलेल्या महाअंतिम फेरीत एकल गीत गायन स्पर्धेत छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेच्या अनुष्का साठे हिने अहिल्यानगर जिल्हा शाखेचे प्रतिनिधीत्व करत सहभागी ५६ स्पर्धकांमधून उत्तम क्रमांक प्राप्त करत पारितोषिक मिळवले.

अनुष्का साठे हिस एकल लहान कलाकार उत्तम सादरीकरण' पुरस्कार मिळाला. सिने नाट्यअभिनेते सुनील गोडसे व शिवशाहीर प्रवीण जाधव, बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के सामंत, प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, कार्यकारिणी सदस्य अनंत जोशी पारितोषिक वितरणास उपस्थित होते.


अनुष्का हिस अहिल्यानगर नाट्यशाखेचे प्रसाद भनगे, शैलेश देशमुख, शाळेच्या शिक्षिका स्नेहल लवांडे यांचे मार्गदर्शन व संजय हजारे, मनिषा साठे यांचे सहकार्य लाभले. वाद्य वृंद साथसंगत आदिनाथ वाघमारे व हर्षल गायकवाड यांनी दिली

अनुष्का साठे व सहभागी विद्यार्थ्यांचे छावनी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, मनोनित सदस्य वसंत राठोड, कार्या. अधिक्षिका स्नेहा पारनाईक, मुख्याध्यापक संजय शिंदे, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे आदींनी अभिनंदन केले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## मंगळावर टिकू शकतात सूक्ष्म जीव



मंगळ हा पृथ्वीप्रमाणेच कठीण पृष्ठभाग असलेला ग्रह आहे. एके काळी मंगळावर वाहते पाणीही होते. त्यामुळे तिथे सूक्ष्म जीवांच्या स्वरूपात का होईना जीवसृष्टी होती का, याबाबतचे कुतूहल नेहमीच असते. मंगळावरील विरळ हवेत सूक्ष्म जीव जिवंत राहू शकतात, असे वैज्ञानिकांनी म्हटलेले आहे. पृथ्वीवरील मिथेन निर्मिती करणारे जिवाणू मंगळावर टिकाव धरू शकतील, असा त्यांचा अंदाज आहे.

भारतीय वंशाच्या एका वैज्ञानिकाचा या संशोधनात समावेश आहे. मंगळाचा पृष्ठभाग सध्या कोरडा व थंड आहे, पण तेथे नद्या, सरोवर व सागर अब्जावधी वर्षांपूर्वी होते याचे पुरावे आहेत. पृथ्वीवर जेथे द्रव आहे तेथे सूक्ष्म जीव आहेत. मंगळावरील ओलसरपणा होता त्यामुळे तेथे अजूनही सूक्ष्म जीव असावेत, असे अनेकांना वाटते. अमेरिकेतील अरकान्सास विद्यापीठाच्या रिबेका मिकॉल यांनी सांगितले की, पृथ्वीवर जसे सूक्ष्म जीव आहेत तसे तिथेही असू शकतात. अगदी आपल्यासारखेच सूक्ष्म जीव तिथे असतील असे नाही, तर त्यात फरक असू शकतो. आधीच्या संशोधनानुसार मंगळाच्या वातावरणात मिथेनचा कार्बनी रेणू सापडला होता. मिथेन निर्मितीचे अजैविक मार्गही आहेत, त्यात ज्वालामुखीची क्रिया हा एक आहे. पृथ्वीवर या वायूची निर्मिती गायीगुरांच्या शेणातून होत असते. मंगळाच्या वातावरणातही मिथेन आहे. पृथ्वीवर जैविक पद्धतीने मिथेनची निर्मिती होते. पृथ्वीवर मिथुनोजेन्स नावाचे सूक्ष्म जीव आहेत, त्यांचा यात मोठा वाटा आहे. त्या सूक्ष्म जीवांना ॲनेरोब्स म्हणतात. त्यांना ऑक्सिजन लागत नाही. ते ऊर्जेसाठी हायड्रोजन वापरतात व कार्बनी रेणू निर्मितीत ते कार्बन डायॉक्साईडमधील कार्बन अणू वापरतात.

मिथुनोजेन्सना ऑक्सिजन लागत नाही व प्रकाशसंश्लेषणही लागत नाही. याचा अर्थ ते मंगळाच्या पृष्ठभागाखाली जिवंत राहू शकतात. त्यामुळे ते मंगळावर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पदवीधर विद्यार्थिनी नविता सिन्हा यांनी मिथेनोजेन्सच्या चार प्रजातींवर प्रयोग केले असून त्यात मिथेनोथर्मोबॅक्टर वुल्फेई, मिर्थनोसारसिना बारकेरी, मिर्थनो बॅक्टेरियम फॉर्मिसिसीयम व मिर्थनोकॉकस मारीपॉलुडिस या जिवाणूंचा समावेश आहे. हे संशोधन जर्नल ओरिजिन्स ऑफ लाईफ ॲंड इव्होल्यूशन ऑफ बायोस्पिअर्समध्ये प्रकाशित झालेले आहे.

## डोक्यावर पांघरुण घेऊन झोपताय?



भारतात आता थंडी हळूहळू वाढू लागेल. हिवाळा सुरू झाला की आपल्याला आपल्या आरोग्याची जरा जास्त काळजी घ्यावी लागते. काही लोकांना रात्री झोपताना डोक्यावरून पांघरुण घेण्याची सवय असते. या सवयीमुळे अनेक आजाराचा सामना करायला लागू शकतो, असे तज्ज्ञ सांगतात. जर आपण बराचवेळ डोक्यापासून पांघरुण घालून झोपत असू तर यानं बरेच त्रास होऊ शकतात. डोक्यापासून पायापर्यंत पांघरुण घेऊन झोपल्यावर अल्झायमर, डिमेंशिया, अथवा हृदयाच्या संबंधित आजार होऊ शकतात, हे आजार लगेच होऊ शकतात असे नसलं, तरी सुद्धा आरोग्याची काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे.

रात्रभर पांघरुण डोक्यावर घेऊन झोपल्यावर शरीरातील ऑक्सिजन पातळी कमी होते. त्याबरोबर उष्णता वाढल्यानं थकवा, डोकेदुखी यांसारख्या समस्या वाढू शकतात. अनेक संशोधकाच्या मते रात्रभर तोंड झाकून झोपल्याने मानसिक आरोग्य बिघडते. स्लीप एपनिया या आजाराला त्रस्त असलेल्या लोकांना झोपताना श्वास घेण्यास त्रास होतो. या आजारातील लोकांना गुदमरू शकतं किंवा त्यांना श्वास घेण्यास अडथळे येऊ शकतात. अनेकदा तर हे रुग्ण अचानक घाबरून जागे होतात. अशा रुग्णांनी पांघरुण डोक्यावरून घेऊन झोपणे हे प्राणघातक असते. जर तुमच्या घरात कोणी डोक्यावर पांघरुण घेऊन झोपत असेल तर त्यांना या विषयी आताच सांगा कारण हे प्राणघातक ठरू शकतं. यामुळे हृदयासंबंधीत त्रास होऊ शकतो. शरीरातील ऑक्सिजन कमी होऊ लागेल. त्यामुळे गुदमरल्यासारखं वाटू शकतं. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे सगळ्यात जास्त त्रास हृदयविकारांच्या समस्येनं त्रस्त असलेल्या किंवा दमा असलेल्या लोकांना उद्भवू शकतो.

## अबब ! केवढा हा पृथ्वीचा ‘भार’



ब्रह्मांडात अनेक ग्रह अस्तित्वात आहेत. यापैकी फक्त पृथ्वीवरच जीवसृष्टी अस्तित्वात आहे, असे सध्यातरी दिसून येते. पृथ्वीवर जीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली यासह अनेक रहस्यांचा नेमका व स्पष्ट उलगडा झालेला नाही. अशातच आणखी एक प्रश्न आहे ज्याच्या उत्तरावरून संशोधकांमध्ये नेहमीच वादविवाद होत राहतात ते म्हणजे पृथ्वीचे वजन. जाणून घेऊया, पृथ्वीचे वजन नेमकं आहे तरी किती?

पृथ्वीवर कोट्यवधी जीव अस्तित्वात आहेत. यासह आकाशाचे टोक गाठणारे उत्तुंग पर्वत तसेच अथांग समुद्रकिनारे, झाडे- झुडपे पृथ्वीच्या पृष्ठभागावर आहेत. पृथ्वीवर वातावरणाचा देखील भार आहे. पृथ्वीचे वजन १३,१७०,०००,०००,०००,०००,०००,०००,००० पौंड इतके आहे. अधिक स्पष्ट सांगायचे झाले तर ५.९७२२१०२४ अर्थात ५,९७४,०००,०००,०००,०००,०००,०००,००० किलोग्रॅम इतके आहे. अर्थात, पृथ्वीचे वजन कमी- जास्त होत आहे. पृथ्वीच्या वातावरणात असणारा हवेचा दाब तसेच पृथ्वीवर असणारे व पृथ्वीच्या बाहेरच्या कक्षातून वातावरणात येणारे वायूकण, धूलीकण यामुळे वजन सातत्याने कमी- जास्त होत आहे.

पृथ्वीवर अनेक गोष्टी या निसर्गनिर्मित तसेच मानवनिर्मित आहेत. यामुळे पृथ्वीचे वजन कायम स्थिर राहू शकत नाही. गुरुत्वाकर्षण बल दोन भिन्न वस्तूंमध्येही असते. हेच सूत्र वापरून दोन वस्तूंमधील गुरुत्वाकर्षण शक्ती मोजून पृथ्वीचे वजन काढण्यात आले. संशोधकांनी गुरुत्वाकर्षण शक्तीच्या मदतीने पृथ्वीचे वजन केले. यासाठी न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांताची मदत घेण्यात आली. अमेरिकेच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्टॅंडर्स ॲंड टेक्नॉलॉजीचे मेट्रोलॉजिस्ट स्टीफन स्लेमिंगर यांनी याबाबतची माहिती दिलेली आहे.



## ड्रोनना लाभणार ‘नवी दृष्टी’

संशोधकांनी एक नवी कॉम्प्युटर व्हिजन सिस्टीम विकसित केली आहे. तिच्या साहाय्याने भविष्यातील ड्रोन तसेच अन्य लष्करी रोबोंना दृश्यात्मकता कमी असताना किंवा दुर्गम वातावरणात लक्ष्याचा माग काढण्यासाठी मदत मिळेल. ही व्हिजन सिस्टीम मांजराच्या डोळ्यांपासून प्रेरित आहे, हे विशेष! या सिस्टीममुळे भविष्यातील ड्रोन आजूबाजूचा परिसर अधिक तीक्ष्ण नजरेने पाहू शकतील. रोबो, ड्रोन्स, स्वयंचलित मोटारी आणि अन्य स्वयंचलित यंत्रणा अधिकाधिक एकसारख्या बनत आहेत. मात्र, या सर्वांमधील एक समस्या म्हणजे सर्वच प्रकारच्या वातावरणात किंवा स्थितीत समोरचे दृश्य स्पष्टपणे पाहण्यासाठी किंवा लक्ष्यभेद करण्यासाठी त्यांच्यासमोर आजही आव्हाने आहेत. उदाहरणार्थ, स्वयंचलित मोटारी मुसळधार पावसात किंवा दाट धुक्याच्या स्थितीत चांगली कामगिरी करू शकत नाहीत. याचे कारण म्हणजे, अशा स्थितीत त्यांचे सेन्सर्स आणि कॅमेऱ्यांवर परिणाम होत असतो. आता संशोधकांनी अद्ययावत लेन्सेस म्हणजेच भिंग आणि सेन्सर्सच्या साहाय्याने ही नवी व्हिजन सिस्टीम विकसित केली आहे. एखाद्या वस्तूचा छडा लावणे व ती कोणती वस्तू आहे हे ओळखण्यासाठी ही सिस्टीम एखाद्या मांजराच्या डोळ्याप्रमाणे काम करते. याबाबतच्या संशोधनाची माहिती ‘सायन्स ॲडव्हान्सेस’ या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. मांजरे ही दिवसाचा प्रकाश आणि रात्रीच्या अंधारातही उत्तम प्रकारे पाहू शकतात. दिवसा मांजराची बुब्बुळे ही उभ्या चकतीसारखी असतात. ती प्रकाश फिल्टर करून बाहेर सोडतात व एखाद्या वस्तूवर त्यांना फोकस करता येतो. रात्रीच्या अंधारात ही बुब्बुळे विस्तारतात. त्यामुळे ती अधिकाधिक प्रकाश आत घेऊ शकतात व त्यांना अंधारातील वस्तूही स्पष्ट दिसतात. अशीच यंत्रणा या नव्या सिस्टीममध्ये बनवलेली आहे. दक्षिण कोरियातील ग्वांगजू इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲंड टेक्नॉलॉजीमधील इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंगचे प्राध्यापक यंग मिन साँग यांनी याबाबतचे संशोधन केले आहे.

## रक्तचाचणीतून होणार स्मृतिभ्रंशाचे निदान



उतारवयात होणाऱ्या मेंदूच्या काही असाध्य विकारांमध्ये डिमेन्शिया, अल्झायमर्स यासारख्या आजारांचा समावेश होतो. शरीरातील अन्य पेशींप्रमाणे चेतापेशी नव्याने निर्माण होऊ शकत नाहीत. त्यामुळे एकदा मेंदूतील अशा पेशींचा ऱ्हास झाला की, त्या जागी नव्या पेशी तयार होऊन मेंदूचे कार्य सुरळीत राहण्याची शक्यता नसते; मात्र असा ऱ्हास रोखण्यासाठी किंवा त्याचा वेग कमी करण्यासाठी वेळीच काही उपाययोजना करता येऊ शकतात. त्यासाठी अशा आजारांचे वेळीच निदान होणेही गरजेचे असते. याबाबत सातत्याने संशोधने होत असतात. रक्त चाचणीतूनही स्मृतिभ्रंश म्हणजेच डिमेन्शियाचे लवकर निदान करण्याची एक पद्धत शोधण्यात आलेली आहे. या चाचणीमुळे याबाबतच्या नव्या औषधांच्या निर्मितीसाठी चालना मिळण्याची शक्यता असल्याचे जर्मनीतील ऱ्हुर विद्यापीठाच्या संशोधकांनी म्हटले आहे.

स्मृतिभ्रंश झालेल्या रुग्णांच्या मेंदूमध्ये लक्षणांच्या सुरुवातीला अमायलॉइड बिटाचा थर जमा होण्यास सुरुवात होते. रक्ताच्या चाचणीमध्ये इम्युनो इन्फ्रारेड सेन्सर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अमायलॉइड बिटा थराचा आकार आणि त्याची रचना समजून घेतली जाते. या चाचणीमुळे स्मृतिभ्रंश आजाराचे निदान लवकर होत असल्याचे दिसून येते, असे मॉलिक्यूलर सेल नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनात स्पष्ट करण्यात आले आहे. निरोगी व्यक्तीच्या मेंदूतील अमायलॉइड बिटाचा थर पातळ असतो, तर स्मृतिभ्रंश झालेल्या व्यक्तीच्या मेंदूमधील अमायलॉइड बिटाचा थर जाड आणि चिकट असतो. त्यामुळे तो वेगळा ओळखता येतो आणि निदान करता येते. या दोन्ही प्रकारचे थर अवरक्त किरण वेगवेगळ्या प्रकारे शोषून घेतात. ही बाब रोगनिदानासाठी उपयोगी ठरते.

## बैलगाडी चालवणाऱ्या महिलांचे गाव

आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपले नाव कमावत आहे. पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. यातच आता महिलांनी आणखी एक आदर्श निर्माण केला आहे. मध्यप्रदेशातील बुऱ्हाणूपर जिल्ह्यातील ठिल्लारी समाजातील महिलांनी एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. या समाजातील महिला या फक्त दुचाकी किंवा चारचाकीच नव्हे, तर बैलगाडी चालवण्यातही तरबेज आहेत. याठिकाणी मुली आणि महिलांना वयाच्या १० व्या वर्षांपासून बैलगाडी चालवायला शिकवले जाते.

भोलाना क्षेत्रातील या समाजाचे तानू यांनी सांगितले की, आमचा ठिल्लारी समाज हा प्रवास करत राहतो. त्यामुळे आम्ही १० वर्षे वयाच्या मुलांना, महिलांना किंवा मुलांना बैलगाडी चालवायला शिकवतो. ते बैलगाडी चालवायला शिकतात. आमचे काम सोपे होऊन जाते. आम्ही माणसे जनावरांची काळजी घेण्यात व्यस्त असतो. त्यामुळे महिला बैलगाडी चालवून आमचा प्रवास पूर्ण करण्यात मदत करतात. यामध्ये मुलगी किंवा महिला, बैलगाडी कशी चालवायची



हे सर्वांनाच माहीत आहे.

भोलाना गावातील महिला बैलगाडी चालवण्यात तरबेज आहेत. ते बैलगाडीत सामान ठेवून प्रवास पूर्ण करतात. ठिल्लारी समाजातील लोक मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि इतर राज्यात फिरत राहतो. जिथे आपल्या जनावरांसाठी चारा उपलब्ध आहे, तिथे आम्ही थांबतो. ठिल्लारी समाजातील महिलांमध्ये आता बैलगाडी चालवणे हे फक्त कौशल्यच नाही, तर हे काम आता त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. तसेच यामुळे त्या आत्मनिर्भर आणि धैर्यवान बनत आहेत.

## महाकाय ग्रहनिर्मितीबाबत नवा सिद्धांत

विज्ञानातील सिद्धांतही अनेक वेळा गृहितकेच असतात. कालौघात नवे संशोधन आधीच्या सिद्धांताला छेद देणारे व नवा सिद्धांत स्थापन करणारे असू शकते. यापूर्वी लहान मातृताऱ्याभोवती महाकाय ग्रहाची निर्मिती होऊ शकत नाही, असे मानले जात होते. मात्र, एका महाकाय ग्रहाच्या शोधाने या समजालाही असाच छेद गेला. या ग्रहाचे नाव आहे ‘एनजीटीएस-१बी’. वार्विक विद्यापीठाचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. डॅनियल बेल्लिस यांनी म्हटले होते की, या ग्रहाचा शोध आमच्यासाठी एक आश्चर्याचा धक्काच होता. इतक्या मोठ्या आकारमानाचा ग्रह इतक्या लहान ताऱ्याजवळ असू शकत नाही, अशीच आमची धारणा होती.


या ग्रहाला चिलीतील अटाकामा वाळवंटात असलेल्या नेक्स्ट-जनरेशन ट्रांझिट सर्व्हे या दुर्बिणीतून पाहण्यात आले होते. हा ग्रह त्याच्या ताऱ्याच्या अतिशय जवळ आहे. पृथ्वी आणि सूर्याच्या अंतराच्या केवळ तीन टक्के अंतरच यामध्ये आहे. या ग्रहाला ताऱ्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास अवघ्या २.६ दिवसांचा कालावधी लागतो. अर्थातच, या ग्रहाचे तापमान अत्याधिक म्हणजे ५३० अंश सेल्सिअस इतके आहे. या ग्रहाच्या मातृताऱ्याचा आकार अतिशय लहान असल्याने या ग्रहाला शोधणे कठीण होते.



आकाशगंगेत असंख्य लहान आकाराचे तारे असून अशा प्रकारच्या ग्रहांचा शोध लागण्याची आणखी शक्यता आहे, असे वार्विक विद्यापीठातील प्रा. पीटर व्हिटले यांनी म्हटले आहे. हा अतिविशाल ग्रह आकाराने आपल्या सौरमालेतील गुरू ग्रहाइतक्या आकाराचा आहे. तो एका लाल ताऱ्याभोवती फिरतो. हा तारा आपल्या सूर्याच्या निम्म्याच आकाराचा आहे. ही सौरमाला पृथ्वीपासून ६०० प्रकाशवर्ष अंतरावर आहे. या ग्रहाचे आणि त्याच्या मातृताऱ्याचे गुणोत्तर आतापर्यंत शोध लावण्यात आलेल्या ग्रहांच्या तुलनेत सर्वात वेगळे आहे.

## नाकात शिरले झुरळ आणि...

कधी कधी आपल्या शरीरात काही अनाहूत पाहुणे येऊन ठाण मांडून बसतात आणि आपल्यालाच त्याची कल्पना नसते. एखादा कीटक नाक, डोळे किंवा कानात गेल्याच्या अनेक घटना देश-विदेशात घडलेल्या आहेत. चीनमधील एका ५८ वर्षीय व्यक्तीसोबत नुकतीच अतिशय धक्कादायक घटना घडली. झोपेमध्ये या व्यक्तीच्या नाकामध्ये झुरळ शिरले आणि श्वसननलिकेमध्ये जाऊन अडकले. जेव्हा त्याला या गोष्टीची जाणीव झाली तेव्हा तो अस्वस्थ झाला. नाकामध्ये शिरलेले झुरळ घशाच्या भागात येत असल्याचेही त्याला जाणवत होते आणि यामुळे त्याला खोकल्याची समस्या सुरू झाली; पण काही झुरळ बाहेर पडेना.



स्थानिक चिनी न्यूज आऊटलेटनुसार, त्यावेळेस नेमके काय घडले हे त्याला समजलेच नव्हते. थोड्या वेळाने तो पुन्हा झोपी गेला. दुसऱ्या दिवशी त्यानं घडलेल्या प्रकाराकडे दुर्लक्ष केले आणि दैनंदिन कामामध्ये तो व्यस्त झाला. पण तीन दिवसांनंतर त्याच्या लक्षात आले की, त्याच्या श्वासाला अतिशय घाणेरडा वास येत होता. दात घासले आणि तोंडाची स्वच्छता राखल्यानंतरही दुर्गंधीची समस्या काही केल्या कमी होत नव्हती. त्यांच्या थुंकीचा रंगदेखील बदलला होता. अखेर त्याने डॉक्टरांना संपर्क साधला. चीनच्या हैनान प्रांतातील हायकोऊ येथील रहिवासी असलेल्या या व्यक्तीने केल्या हैनान रुग्णालयात जाऊन ईएनटी तज्ज्ञाकडून तपासणी करून घेतली. येथे तपासणीदरम्यान श्वसनमार्गाच्या वरील भागामध्ये काहीही असामान्य आढळले नाही. पण समस्या गंभीर असल्याचे लक्षात घेता, डॉक्टरांनी त्याला डॉ. लिन लिंग यांच्याशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. डॉ. लिन यांनी त्याच्या छातीचे सीटीस्कॅन केले, ज्यामध्ये फुप्फुसाच्या मागील बाजूस बेसल सेगमेंटमध्ये त्यांना एक गोष्ट आढळली, ज्याद्वारे तेथे बाहेरील गोष्ट अडकल्याचे स्पष्ट झाले. संबंधित व्यक्तीला या प्रकरणात तज्ज्ञांनी ब्रॉन्कोस्कोपी टेस्ट करण्याचा सल्ला देण्यात आला. डॉ. लिन यांनी आऊटलेटला दिलेल्या माहितीनुसार, प्रक्रियेदरम्यान मला ब्रॉन्कसमध्ये पंख असलेली एखादी गोष्ट स्पष्टपणे दिसली. बाहेरून शरीराच्या आतमध्ये गेलेल्या या गोष्टीवर कफ जमा झाला होता. कफ काढल्यानंतर ही वस्तू झुरळ असल्याचे आढळले. यानंतर काळजीपूर्वक श्वसननलिकेतून झुरळ बाहेर काढण्यात आले आणि शरीराचा तो भागदेखील पूर्णपणे स्वच्छ करण्यात आला. रुग्णाच्या तोंडाला येणारी दुर्गंधीची समस्या लवकरच दूर झाली आणि दुसऱ्या दिवशी त्याला डिस्चार्जही देण्यात आला.

## शतपावली का गरजेची?



केवळ उदरभरण करण्यासाठी किंवा चवीसाठी खाऊ नये, तर आरोग्याचा विचार करून पौष्टिक आहार घ्यावा, हे जसे गरजेचे आहे तसेच जेवणावर आडवा हात मारून लगेचच आडवे होऊ नये, हेही समजून घेणे गरजेचे ठरते. अनेकांना जेवल्यानंतर बसून राहण्याची किंवा पहुडण्याची सवय असते. त्याचे वाईट परिणाम आपल्याला पाहायला मिळतात. जेवल्यानंतर अचानक कोणतेही काम करणे किंवा झोपणे टाळले तसेच जेवल्यानंतर फेरफटका मारण्याची सवय लावल्यास उत्तम. भोजनोत्तर शतपावली करण्याची आपल्याकडे जुन्या काळापासूनच पद्धत आहे. ही पद्धत आरोग्यासाठी अतिशय लाभदायक ठरते. जेवणानंतरच्या अशा शतपावलीचे हे काही लाभ...

**रक्तातील साखर नियंत्रित राहते :** यासंदर्भात अभ्यासात असे म्हटले आहे की, जर जेवल्यानंतर थोडा फेरफटका मारला, तर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते. यासाठी भोजनानंतर किमान ५ मिनिटे चालणे आवश्यक आहे, असे करणे खूप फायदेशीर मानले जाते.

**पचनसंस्था उत्तम राहते :** खाल्ल्यानंतर फेरफटका मारण्याची सवय असेल, तर ते पचनसंस्थेसाठी फायदेशीर ठरू शकते. चालणे पोट आणि आतडे उत्तेजित करते, जे अन्न पचनमार्गातून अधिक जलद हलवण्यास मदत करते.

वजन नियंत्रित राहते : जर तुमचे वजन वाढले असेल, तर तुम्ही वाढलेले वजन व्यवस्थापित करा, यामुळे तुमच्या शरीरातील लठ्ठपणा नियंत्रणात राहतो. १ पौंड कॅलरीज बर्न करण्यासाठी तुम्हाला दररोज ३,५०० कॅलरीज, म्हणजेच ५०० कॅलरीज बर्न कराव्या लागतील. खाल्ल्यानंतर थोडे चालणे चयापचय वाढवू शकते.

**मूड सुधारतो :** जेवणानंतर चालण्याचा व्यायाम केल्यास मूड सुधारतो. अशा हलक्या व्यायामामुळे शरीरातील कॉर्टिसोलसारख्या स्ट्रेस हार्मोन्सची पातळी कमी होण्यास मदत होते. हे एंडोर्फिन आणि ऑक्सिटोसिनदेखील वाढवते, ज्याला लव्ह हार्मोनदेखील म्हणतात. या चालण्याच्या व्यायामाने तुमची झोपेची समस्याही दूर होऊ शकते, असे तज्ज्ञ सांगतात.

# रोटरी विश्वातील शांततेचा दीपस्तंभ म्हणजे रोटरी पीस सेंटर

## प्रांतपाल संतोष मराठे यांचे प्रतिपादन; साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात रोटरी पीस सेंटरचा लोकार्पण सोहळा

नगर – येथील साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात रोटरी पीस सेंटरचा लोकार्पण सोहळा आंतरराष्ट्रीय रोटरी प्रांत ३१३१ चे प्रांतपाल संतोष मराठे यांच्या हस्ते झाला. सदर प्रसंगी पीस सेंटरच्या संचालिका, रोटरी पीस कमिटीच्या डायरेक्टर डॉ. सुधा कांकरिया, साईबन प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया, माजी प्रांतपाल शिरीष रायते, प्रमोद पारीख, नियोजित प्रांतपाल क्षितीज झावरे, ब्रह्मकुमारीज् संस्थेच्या संचालिका निर्मला दिदी, शिक्षण तज्ज्ञ डॉ. सर्जेराव निमसे, अध्यक्ष सुभाष गर्जे उपस्थित होते.


साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात रोटरी पीस सेंटरचा लोकार्पण सोहळा आंतरराष्ट्रीय रोटरीचे प्रांतपाल संतोष मराठे यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी डॉ. सुधा कांकरिया, अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया आदी.

रोटरी विश्वातील शांततेचा दीपस्तंभ म्हणजे निसर्गाच्या कुशीत वसलेले हे रोटरी पीस सेंटर आहे. याव्दारे समाजात शांती निर्माण करणारे अनेक प्रकल्प कार्यान्वीत होत आहेत याचा आनंद वाटतो. मन:शांतीसाठी राजयोगा मेडिटेशनची सुविधा, स्त्रीभ्रुणहत्या तसेच हार्ट अ‍ॅटॅक विषयीचे सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी स्त्री जन्माचे स्वागत करा तसे निरोगी हृदय प्रकल्प तसेच नैराश्य व आत्महत्या रोखण्यासाठी कौन्सीलींग सेंटर, जागतिक शांतीकडे घेऊन जाणारे संघटीत मेडिटेशन हे सर्व प्रकल्प समाज उपयोगी व शांती प्रस्थापित करणारे आहेत व सध्या जगात प्रत्येकालाच शांतीची आवश्यकता आहे. हे रोटरी पीस सेंटर समाजासाठी वरदान ठरत आहे. असे प्रतिपादन संतोष मराठे यांनी केले. पुणे येथे सिम्बायसिस इंस्टीटयुट व्दारे रोटरीचे मोठे पीस ट्रेनिंग सेंटर उभारले जात आहे. त्यातून शांतीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. अशी माहिती श्री. मराठे यांनी दिली.

सदर कार्यक्रमात माजी प्रांतपाल प्रमोद पारीख, शिरीष रायते, क्षितीज झावरे, ब्रह्मकुमारीज् अहिल्यानगरच्या निर्मला दिदी यांच्या हस्ते इको फ्रेंडली ध्यान मंदिर, सेल्फी पॉईंट, पीस पार्क, शांतता पहाडी, हेल्दी हार्ट प्रोजेक्ट, स्त्री जन्माचे स्वागत करा प्रोजेक्ट प्रदर्शनीचे उद्घाटन झाले.

सुरूवातीस अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी 'आओ हम तुम शांतीदूत बन जाए' हे गीत सादर करून क्लब तर्फे स्वागत केले. ते म्हणाले की, नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकित झालेल्या डॉ. सुधा कांकरिया यांच्या नेतृत्वाखाली रोटरी क्लब ऑफ अहमदनगरने २०२३-२४ मध्ये व्हर्च्युअल रोटरी पीस सेंटरची स्थापना केली. ऑनलाईन व ऑफलाईन समुपदेशनाव्दारे युवकांना मार्गदर्शन केले, आत्महत्येच्या प्रवृत्तीवर मात करण्यास अनेकांना मदत केली. तसेच कैद्यांच्या मानसिक शांततेसाठी महाराष्ट्रातील अनेक तुरूंगामध्ये राजयोग मेडिटेशन यशस्वीरित्या सुरू करण्यात आले. या पथदर्शी प्रयत्नांसाठी २०२४-२५ मध्ये क्लबला डिस्ट्रीक्ट ३१३२ मधील प्रथम पीस बिल्डर क्लब म्हणून गौरविण्यात आले. आता रोटरी वर्ष २०२५-२६ मध्ये क्लब एक नवा टप्पा गाठत आहे. साईबन अ‍ॅग्रो टुरिझम प्रोजेक्ट येथे रोटरी पीस सेंटरची स्थापना हा भारतात पहिल्या काही सेंटर मधील एक असून प्रांत ३१३२ मधील हा पहिलाच आहे. हजारो पर्यटकांना त्याचा लाभ होणार आहे. डॉ. सुधाताई व डॉ. प्रकाश कांकरिया यांनी मोलाची मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

या प्रसंगी डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की आंतरिक शांती, सामाजिक शांती व त्यातुन जागतिक शांती कार्यरत असते. आंतरिक मन:शांतीसाठी राजयोगा मेडिटेशन, सामाजिक प्रश्न सोडवून त्यातुन निर्माण होणारी सामाजिक शांतता व हे सगळे मिळून जागतिक शांततेकडे पडणारे मंगल पाऊन यासाठी रोटरी पीस सेंटर-साईबन में मधुबन कार्यरत आहे. मन:शांतीसाठी बह्माकुमारीज चे राजयोगा मेडिटेशन तर सामाजिक शांतीसाठी रोटरीचे सेवा कार्य या दोन्हींचा संगम येथे होत आहे. म्हणूनच रोटरी पीस सेंटरला- साईबन में मधुबन हे नांव देण्यात आले आहे. सदर प्रसंगी बी के निर्मला दिदी यांनी राजयोगा मेडिटेशनची माहिती देऊन सर्वांना शांततेची अनुभुती करवली.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आभार मानले. राजेश उपाध्ये यांनी समर्पक सुत्रसंचलन केले त्यांना निलेश वैकर यांनी मदत केली. सदर प्रसंगी सचिव संदीप ठोंबे, पुरूषोत्तम जाधव, दिलीप कर्नावट, सुनिता कर्नावट, माधव देशमुख, साधना देशमुख, सुहास क्षीरसागर, स्नेहल क्षीरसागर, अमर गुरप उपस्थित होते.

# ठेवीदारांची रक्कम परत न दिल्याने रावसाहेब नागरी पटवर्धन पतसंस्थेच्या संचालकांविरुद्ध वॉरंट बजावण्याचे आदेश

नगर- अहिल्यानगर येथील रावसाहेब पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित तथा प्रवरा नागरी सहकारी पतसंस्था पाईपलाईन रोडच्या सर्व संचालकांनी ठेवीदारांची ठेव रक्कम न दिल्याने त्यांच्या विरुद्ध जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने वॉरंट काढण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, शंकरराव छबुराव घटे, सौ.शीला शंकरराव घटे, विक्रम शंकरराव घटे (रा. गंगा अपार्टमेंट तोफखाना अहिल्यानगर) व श्रीमती सुनंदा विजयकुमार पाटेकर (रा. मांजरी बु. पुणे) या ठेवीदारांनी अहिल्यानगर येथे रावसाहेब नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर तथा प्रवरा नागरी सहकारी पतसंस्था पाईपलाईनरोड सावेडी अ. नगर येथे एकंदरीत रक्कम रुपये २७ लाख ९० हजार ३५६ रुपयांच्या ठेवी ठेवलेल्या होत्या. त्या ठेवींची मुदत संपूनही रावसाहेब पटवर्धन पतसंस्थेच्या चेअरमन, श्रीमती लतिका नंदकुमार पवार, संचालक सुभाष विद्याधर रेखी, संतोषकुमार संभाजीराव कदम, नसीर अब्दुल्ला शेख, अ‍ॅड. विनायकराव कमलाकर पंडित, लक्ष्मण सखाराम जाधव, भास्कर सिताराम पवार, शरद शंकरराव धोंडे, प्रकाश नथू सोनवणे, संजय गंगाधर मंत्री, श्रीमती. शकुंतला भाऊसाहेब चौधरी, सौ. संजीवनी संभाजीराव पानसंबळ, सौ. आशाबाई हरीष भिंगारदिवे आदींनी ठेवीदारांच्या ठेवी व्याजासह परत केल्या नाही म्हणून सर्व संचालका विरुद्ध तक्रार दाखल केलेली होती.

त्या तक्रारीचा निर्णय होऊन जिल्हा तक्रार निवारण आयोगाने ठेवीदारांचे तक्रार अंशतः मंजूर करून सर्व संचालकांनी १ ते १४ यांनी वैयक्तिक रितीने व संयुक्तरीतीने ठेविदारांची रक्कम ६ टक्के व्याजासह देण्यात यावी अशा प्रकारे एकंदरीत ठेवीदारांची रक्कम २७ लाख ९० हजार ३५६ रुपये व शारीरिक व मानसिक त्रासापोटी रक्कम रुपये १६ हजार तसेच तक्रारीचा खर्च ७ हजार रुपये एक महिन्याच्या आत द्यावा, असा आदेश २१ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेला होता. सदर आदेशाचे सर्व संचालकांनी पालन न केल्याने या ठेवीदारांनी पुन्हा जिल्हा तक्रार निवारण आयोग अहिल्यानगर यांच्याकडे दरखास्त दाखल करून सर्व १४ संचालकांच्या विरुद्ध त्यांनी ठेवीदारांची व्याजासह रक्कम रुपये ४२ लाख ९२ हजार ३१७ रुपये दिली नसल्याने वॉरंट काढून त्यांना जेलमध्ये टाकावे म्हणून विनंती केलेली होती.

सदर विनंती मान्य करून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग अहिल्यानगर यांचे अध्यक्ष श्रीमती प्रज्ञा देवेंद्र हेंद्रे, सदस्य चारुशीला विनोद डोंगरे व दुसऱ्या सदस्या संध्या श्रीपती कसबे यांनी दिला आहे. त्यामुळे आता संचालकांना दिसताक्षणी अटक होण्याची शक्यता आहे.

या महत्वपूर्ण प्रकरणात ठेवीदाराच्या वतीने अ‍ॅड. सुरेश लगड यांनी काम पाहिले. त्यांना अ‍ॅड. शारदा लगड, अ‍ॅड. सुजाता बोडखे, अ‍ॅड. विराज लगड व अ‍ॅड. प्रतिक्षा मंगलाराम आदींनी मदत केली.

# मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठीची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावेत

नगर – शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विजाभज, इमाव व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलवर ३१ ऑगस्ट २०२५ पासून सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व महाविद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे विहित वेळेत भरून घेण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील महाविद्यालयांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, विद्यावेतन व राजर्षी शाहू गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत महाडीबीटी प्रणालीवर नवीन व जुनी आवेदनपत्रे तातडीने भरून घेण्यासाठी समान संधी केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. आवेदनपत्रे मुदतीत सादर न झाल्यास व विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयातील प्राचार्यांची असेल, असेही कळविण्यात आले आहे.

# शहरात नागरी सुविधांचा बोजवारा; मनपा आयुक्तांना घातला घेराव

नगर – शहरातील कचरा, घाणीचे साम्राज्य, भटक्या कुत्र्यांचा वाढता त्रास आणि बाजारपेठांतील वाढते अतिक्रमणे या नागरी समस्यांवर भाजप पदाधिकारी व माजी नगरसेवकांनी आयुक्त यशवंत डांगे यांना घेराव घातला. शहरातील कचरा उचलला जात नसल्याने ठीक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी व रोगराई पसरत आहेत. यावर तातडीने उपाययोजना न केल्यास आयुक्तांच्या कार्यालयात कचरा आणून टाकण्याचा इशारा जिल्हा सरचिटणीस निखील वारे व माजी नगरसेवक धनंजय जाधव यांनी दिला.


शहर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना घेराव घालत शहरातील विविध समस्यांबाबत जाब विचारला. यावेळी भाजपचे माजी नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

माजी महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले, गेल्या दोन तीन महिन्यांपासून शहरात कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. आयुक्त सांगतात की रोज दीडशे टन कचरा उचलला जातो तरीही जागोजागी कचऱ्याचे ढीग कसे काय आहेत. या समस्यावर ८ दिवसात उपाययोजन राबवावी अन्यथा आम्ही शांत बसणार नाही.

संगीता खरमाळे यांनी भटक्या कुत्र्यांचा प्रश्न उपस्थित करून त्यावर मार्ग काढण्याची मागणी केली. लवकरच नवरात्र, दसरा व पाठोपाठ दिवाळी सण येत असल्याने शहरातील सर्व बाजारपेठ्या अतिक्रमण मुक्त करा, अशी मागणीही यावेळी पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी कचरा संकालांच्या निविदा पुन्हा नव्याने काढाव्या लागणार आहे. ती प्रक्रिया होत असून शहरात कचरा उचलण्यासाठी ५५ गाड्या व १७ ट्रॅक्टरची व्यवस्था करण्यात आली आहे, असे सांगून श्वान निर्बीजीकरणाचे कामही हाती घेण्यात आले असल्याचे सांगितले.

यावेळी अजय चितळे, नीरज राठोड, मयूर ताठे, सोमनाथ जाधव, करण कराळे, अमोल निस्ताने, बाळासाहेब भुजबळ, गोपाल वर्मा, शिरीष जानवे, महेश गुगळे, चंदन बारटक्के, विजय गायकवाड, अजित कोतकर, बाबासाहेब सानप, महेश तवले, रामदास आंधळे, अजित बोरुडे, पुष्कर तांबोळी, संपत नलावडे, मनोज दुल्लम, बंटी दापसे, महेश नामदे, विशाल खैरे, पल्लवी जाधव, अर्चना बनकर व दत्ता गाडळकर आदींसह पदाधिकारी उपस्थित.

# अहिल्यानगर शहरात पथविक्रेते, फेरीवाल्यांसाठी २ ऑक्टोबरपर्यंत लोककल्याण मेळावा

**पथविक्रेते, फेरीवाल्यांनी प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेचा लाभ घ्यावा : आयुक्त**

नगर – शहरातील फेरीवाले, पथविक्रेत्यांना प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत लोक कल्याण मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. केंद्र सरकारच्या गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. शहरातील पथविक्रेते, फेरीवाल्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही यांनी केले आहे.

केंद्र सरकारने प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेची पुनर्रचना करून सदर योजनेला मुदतवाढ दिली. या १६ दिवसांच्या कालावधीत लोक कल्याण मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. पीएमस्वनिधी योजनेअंतर्गत नवीन अर्जासाठी प्रचार प्रसिद्धी करणे, आधीच मंजूर झालेल्या अर्जाचे कर्ज वितरण सुलभ करणे, बँकेकडून परत केलेले प्रलंबित अर्ज निकाली काढणे, बँकांकडे मंजुरीसाठी प्रलंबित अर्ज निकाली काढणे, प्रलंबित लाभार्थ्यांचे डिजिटल ऑनबोर्डिंग सुनिश्चित करणे, अन्न पदार्थ पथविक्रेत्यांचे प्रशिक्षण आयोजित करणे, पथविक्रेत्यांचे सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग करून त्यांना योजनांचा लाभ मिळून देणे या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अहिल्यानगर शहरात सुमारे १० हजार पथविक्रेते, फेरीवाल्यांची नोंद आहे. या योजनेतून पहिल्या टप्प्यात १० हजार, दुसऱ्या टप्प्यात २० हजार व तिसऱ्या टप्प्यात ५० हजार रुपये कर्ज उपलब्ध करून दिले जात होते. शहरात साडेसात हजार प्रस्ताव करण्यात आले आहेत. या योजनेची जनजागृती, नवीन नोंदणी व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# मराठा सेवा संघ व मराठा नागरी पतसंस्थेचा नगरमध्ये ३० सप्टेंबरला गुणगौरव समारंभ

नगर – समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेले समाजबांधव व भगिनी, तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, कीडा व विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनीं व गुणवंतांचा मराठा सेवा संघ व मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने गुणगौरव समारंभ ३० सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता कोहिनुर मंगल कार्यालय, पारीजात चौक गुलमोहर रोड, सावेडी अहिल्यानगर येथे आयोजीत केला आहे.

या समारंभासाठी विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेले समाजबांधव, एस. एस. सी परिक्षेत ७५ व एच. एस. सी. परिक्षेत ७० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवलेले विद्यार्थी व विद्यार्थीनी, प्रज्ञाशोध परीक्षा पास झालेले तसेच शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा पास झालेले विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच एन.डी.एस., एम.पी.एस. सी., यु.पी. एस. सी, मेडीकल व इंजिनीअरींग परीक्षा पास झालेले विद्यार्थी व विद्यार्थीनी, त्याचप्रमाणे सर्व शाखांचे पदवी व पदवीत्तर परीक्षा शेकडा ६० टक्के पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व विद्यार्थीनी, तसेच किडा सहित्य, सांस्कृतिक, कला क्षेत्रात जिल्हा राज्य व राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी किंवा त्यांच्या पालकांनी आपली माहीती अधिकृत प्रमाणपत्र तथा मार्क शिट च्या छायांकित प्रतिसह व स्वतःचा पत्ता व फोन नंबर सह मराठा सेवा नागरी पतसंस्था, मराठा सांस्कृतीक भवन, बारातोटी कारंजा अहिल्यानगर येथे २५ सप्टेंबर पर्यंत पाठवावी. असे अवाहन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे व मराठा नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष चेअरमन इंजि विजयकुमार ठुबे, व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे, किशोर मरकड, लक्ष्मणराव सोनाळे, ज्ञानदेव पांडुळे, राजश्री शितोळे, सतीश इंगळे, प्रा. किसन पायमोडे, यशवंत शिंदे, अ‍ॅड. काशिनाथ डोंगरे, ज्ञानेश्वर अनभुले, इंजि. संभाजी मते, व्दारकाधीश राजेभोसले, इंजि. बाळासाहेब सोनाळे, डॉ. कल्पना ठुबे, अ‍ॅड. राजेश कावरे, निवुत्ती रोहोकले, सुनिल जाधव यांनी केले आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालयावर सकल मातंग समाजाचा मोर्चा, हल्लेखोर सराईत गुंडांना तात्काळ अटक करून कारवाई करा

नगर – श्रीरामपूर शहरात घडलेल्या भीषण घटनेच्या निषेधार्थ सकल मातंग समाजाच्या वतीने समाजबांधवांनी पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले.


श्रीरामपूर शहरात घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ सकल मातंग समाजाच्यावतीने पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, मातंग समाजातील साई साळवे, रुद्र जगधने व भोलू गुप्ता यांच्यावर सराईत गुंड यांनी धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तिघेही युवक रक्ताच्या थारोळ्यात गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले. त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

यापूर्वीही या सराईत गुंडांविरोधात पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती, मात्र श्रीरामपूर पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळेच या आरोपींचा धीर वाढून त्यांनी मोठा गुन्हा केला असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी या मोर्चातून करण्यात आली.

या मोर्चात अंकुश मोहिते, सुनील उमाप, चंद्रकांत काळाखे, नामदेव चांदणे, संजय चांदणे, जय भोसले, पप्पू पाटिल, राम वडागळे, राम काते, पोपटराव पाथरे, प्रकाश वाघमारे, दिपक पाचारणे, लहु खंडागळे, सनी लोखंडे, सुनिल सकट, आकाश भोसले, अशोक भोसले, यशोदास वाघमारे, सागर साठे, नितीन खंडारे, दीपक सरोदे, हिना उबाळे, विलास ससाने, सागर उबाळे, रोहित जोशी, स्वप्निल साळवे, सुनील ढोले, राहुल ठोकळ यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

# महिला, मुले, मुलींच्या कलागुणांकरिता गणेशोत्सव चांगले माध्यम

**सुनील राऊत यांचे प्रतिपादन**

भिंगार – गणेशोत्सवामध्ये आपल्यातील कलागुण सादर करत अनेक कलाकार घडले आहेत. शिक्षणासोबत आपली आवड, छंद जोपासत कोणतीही किमान एक कला आत्मसात करावी, असे आवाहन प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना नाट्य, लघुचित्रपट लेखक, अभिनेते, व्याख्याते सुनील राऊत यांनी केले. स्पर्धेत सहभाग घेणं हेच महत्वाचं असुन इतर स्पर्धकांची कलाकृतीही आपण मनापासून पाहिली, ऐकलीच पाहिजे कारण पाहाणं, ऐकणं हेसुद्धा शिकणंच असतं. स्पर्धेत बक्षिस मिळालं तर अत्यानंद होतो पण बक्षिस मिळालं नाही तर जिद्द, आत्मविश्वासाने प्रयत्न करुन पुढील वर्षीच्या स्पर्धेत मी प्रथम क्रमांक मिळवणारच हे मनापासून ठरवायचं, तसे प्रयत्न करायचेच. काही वलयांकित व्यक्तींच्या जीवनातील अनुभव राऊतांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.


विजयनगर बेलेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळ आयोजित स्पर्धांचे बक्षिस वितरण करताना लेखक सुनील राऊत.

आलमगीर रोडवरील, विजयनगर बेलेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळाने गणेशोत्सवात शालेय, म हाविद्यालयीन मुलं, मुली आणि महिलांकरिता हस्ताक्षर, निबंध स्पर्धेसह विविध प्रकारच्या घेतलेल्या स्पर्धांच्या बक्षिस वितरण समारंभात करण्यात आले. याप्रसंगी सुनील राऊत, लिलावती पार्क कॉलनीतील डॉ. थोरात, सत्रेकाका, मंडळाचे संस्थापक अविनाश (बंडु) बेद्रे, कांबळे काकु, ढुमणे मावशी, राऊत मावशी ह्यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिस देण्यात आले.

डॉ. थोरात म्हणाले की कॉलनीतील एकी चांगली आहे. लवकरच रक्तदान शिबीर, महिलाची रक्तगट तपासणी शिबीर घेणार आहोत.

बंडु बेद्रे म्हणाले की स्पर्धांना प्रतिसाद मिळाला आहे.

लीलावती पार्क मित्र मंडळ तर्फे कॉलनी मध्ये विविध स्पर्धा, व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लीलावती पार्क मधील सदस्य बंडू बेद्रे, विशाल राऊत, महेश भाकरे, सुजित गोटे, समीर वाघमारे, ओंकार लिपारे, राजू ढुमणे, प्रमोद बरबडे, प्रशांत भंडारे, प्रवीण चव्हाण, नारायण महाजन, तुकाराम गुटे, बाबू कांबळे, मयूर कडलग, राजू कुराडे, अतुल काकडे, लोखंडे समर्थ, जय लोंढे, आदित्य बेद्रे, शिवांश नवले, महिला, मुलांनी व मुलींनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यात आलेला आहे.

# साईदीप सह्याद्री रुग्णांसाठी वरदान

**राहुल कर्डीले यांचे प्रतिपादन**

नगर – नगर जिल्हा व आसपासच्या जिल्ह्यातील रुग्णांसाठी साईदीप सहयाद्री हॉस्पिटल हे अत्याधुनिक व तत्पर आरोग्य सेवा देणारे वरदान आहे, असे प्रतिपादन नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी व्यक्त केले.


राहुल कर्डीले यांनी सह्याद्री हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली असता हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. दीपक एस एस व संचालक डॉ. निसार शेख यांनी त्यांचा सत्कार केला.

नगर जिल्हा भेटी दरम्यान राहुल कर्डीले यांनी हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली. हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. दीपक एस एस व संचालक डॉ. निसार शेख यांनी राहुल कर्डीले यांचा सत्कार केला. यावेळी हॉस्पिटलचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राहुल कर्डीले म्हणाले की नगरहुन पुणे, मुबंईला उपचारासाठी जाणाची जिल्ह्यातील व आसपासच्या जिल्ह्यातील रुग्णांना गरज नाही कारण परिपूर्ण व अत्याधुनिक आरोग्य सेवा ज्यामध्ये सर्व तपासण्या शस्त्रक्रिया तसेच रोबोटीक गुडघ्याच्या व खुब्याच्या शस्त्रक्रिया, नव्याने सुरु होणारे कॅन्सर रेडीएशन युनिट, अवयोव प्रत्यरोपण सारख्या आधुनिक आरोग्य सेवा एकाच छताखाली उपलब्ध असल्यामुळे रुग्णांना याचा लाभ घेता येतो, डॉ. दीपक व त्यांचे सहकारी डॉक्टर्स यांनी दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेऊन हॉस्पिटलची निर्मिती केली. स्वच्छ व सुंदर इमारत तसेच भविष्यातील कृत्रिम बुद्धिमातेचा वापर करून अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करणारे हे एक आरोग्य मंदिरच आहे, असे म्हणत महात्मा फुले व आयुष्मान भारत योजनेतील लाभार्थींना सर्व आरोग्य सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात येतात यामुळे सर्वसामान्य रुग्णांना याचा पुरेपूर लाभ मिळतो. यावेळी कर्डीले यांनी रुग्णांनाशी वार्तालाप केला.

